रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १८ • अंक २१६
www.ramprahar.com

• रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ • पाने ८ • किंमत ₹ २


## मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींमध्ये आता सरपंचच प्रशासक



**मुंबई** : राज्यातील मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या कारभाराबाबत राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय घेतला आहे. ज्या ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारीपर्यंत संपत आहे, तिथे आता बाहेरील प्रशासक न नेमण्याऐवजी विद्यमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून काम पाहण्याची संधी दिली जाणार आहे. सरकारच्या या निर्णयामुळे विकासकामांमध्ये येणारा अडथळा दूर होणार असल्याचे बोलले जात आहे. प्रशासकीय कामात सुसूत्रता राखण्यासाठी आणि अचानक होणाऱ्या बदलांमुळे कामाचा खोळंबा होऊ नये या उद्देशाने हे पाऊल उचलण्यात आले आहे. केवळ सरपंचच नव्हे, तर त्यांच्या मदतीसाठी उपसरपंच आणि ग्रामपंचायतीचे इतर सदस्य यांची एक प्रशासकीय समितीदेखील कार्यरत राहणार आहे.


### अंतरंग

कर्जतमध्ये दुचाकी चोरांची टोळी गजाआड/२

रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४

कोपरखैरण्यात होळी चषक क्रिकेट स्पर्धा/८


# कोकणवासीयांचा शिमगा गोड!

## मुंबई-विजयदुर्ग जलप्रवासाचा १ मार्चपासून श्रीगणेशा

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकणातील चाकरमान्यांसाठी यंदाचा शिमगोत्सव विशेष ठरणार आहे. गेल्या अनेक दशकांपासून प्रतीक्षेत असलेली मुंबई ते विजयदुर्ग ही जलवाहतूक सेवा १ मार्चपासून अधिकृतपणे सुरू होत आहे. राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे यांच्या पुढाकाराने आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली ही सेवा सुरू करण्यात येत असून यामुळे मुंबई-कोकण प्रवासाचा एक नवा अध्याय सुरू होणार आहे.

रस्ते वाहतुकीतील कोंडी आणि रेल्वे आरक्षणाची अडचण लक्षात घेता ही जलवाहतूक सेवा कोकणवासीयांसाठी मैलाचा दगड ठरणार आहे. या सेवेसाठी 'एम२एम प्रिन्सेस' हे आधुनिक जहाज चालवले जाणार असून एका फेरीमध्ये ६२० प्रवासी आणि ३५ वाहने नेण्याची त्याची क्षमता आहे. या जहाजाने अवघ्या सहा ते सात तासांत मुंबईहून विजयदुर्गला पोहचता येईल. या सेवेची उद्घाटन फेरी १ मार्चला सकाळी ८ वाजता मुंबईतील भाऊचा धक्का येथून मंत्री नितेश राणे यांच्या उपस्थितीत निघणार आहे.



### पर्यटनाला मिळणार चालना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जलवाहतूक प्रोत्साहन धोरणांतर्गत हा उपक्रम राबविला जात आहे. यामुळे कोकणातील पर्यटन, व्यापार आणि प्रादेशिक संपर्काला मोठी गती मिळेल, असा विश्वास मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केला आहे. या फेरीसाठी तिकीट विक्री सुरू झाली असून इच्छुकांना www.m2mferries.com, https://www.m2mferries.com या संकेतस्थळावर जाऊन बुकिंग करता येईल.

## माझी वसुंधरा राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण

# पनवेल मनपाचा प्रथम क्रमांकाने गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरण संवर्धन व शाश्वत विकासाच्या दिशेने भरीव कामगिरी करत पनवेल महापालिकेने माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत अमृत शहरे (तीन लाख ते १० लाख लोकसंख्या) गटामध्ये राज्यात प्रथम क्रमांक पटकावून सर्वोत्तम हरित यश संपादन केले आहे. याबद्दल महापालिकेला शनिवारी (दि. २१) मुंबईत झालेल्या शानदार सोहळ्यात पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

मुंबईच्या वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियममध्ये आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभात राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर तसेच पर्यावरण व वातावरणीय बदल विभागमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते मानाचा माझी वसुंधरा ४.० आणि ५.० अभियानाचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पनवेल महापालिकेच्या वतीने महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे, उपायुक्त स्वरूप खारगे व डॉ. वैभव विधाते यांनी हा पुरस्कार स्वीकारला.



माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पनवेल महापालिकेने हरितक्षेत्र वाढ, प्लास्टिकमुक्त शहर उपक्रम, जलसंधारण, ऊर्जा बचत, घनकचरा व्यवस्थापन सुधारणा, नागरिक जनजागृती मोहिमा तसेच शाळा-महाविद्यालयांमधील पर्यावरणविषयक स्पर्धा अशा विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली.

महापालिकेने 'हरित पनवेल, स्वच्छ पनवेल, प्रगतीशील पनवेल' या ध्येयवाक्याने नागरिकांचा सक्रिय सहभाग मिळवत पर्यावरण संरक्षणाला लोकचळवळीचे स्वरूप दिले. यामध्ये स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, शैक्षणिक संस्थांचाही प्रतिसाद लाभला.

या यशाबद्दल आयुक्त मंगेश चितळे यांनी प्रशासनातील सर्व अधिकारी-कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांचे विशेष अभिनंदन करत भविष्यातही पर्यावरणपूरक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त केला तसेच पुढील वर्षीही प्रथम क्रमांकाचे लक्ष ठेवून हॅट्ट्रिक साधण्याचा प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले.

पर्यावरणीय शाश्वततेसाठी आखलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, नियमित परीक्षण आणि पारदर्शक कामकाजामुळे पनवेल महापालिकेला राज्यस्तरावर सर्वोच्च मानांकन प्राप्त झाले, अशी भावना पर्यावरण विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे यांनी व्यक्त केली.

### हा सन्मान सर्व पनवेलकरांचा -महापौर नितीन पाटील

महापौर नितीन पाटील यांनी या वेळी सांगितले की, हा सन्मान संपूर्ण पनवेलकरांचा आहे. पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेतल्यामुळेच आज आपण राज्यात प्रथम क्रमांक पटकावू शकलो. यापुढेही सर्वांनी अशा स्तुत्य उपक्रमांमध्ये आपले योगदान द्यावे.

माझी वसुंधरा ५.०करिता एकूण सात कोटी इतके बक्षीस जाहीर झाले असून यापूर्वीच्या माझी वसुंधरा ४.०करिताही सात कोटी इतके बक्षीस प्राप्त झाले आहे. विविध हरित क्षेत्र, सौर ऊर्जेचे प्रकल्प, वृक्षारोपण तसेच वसुंधरेबाबत जनजागृती आदी उपक्रमांसाठी या निधीचा वापर करण्यात आला.

## उलवेतील कबड्डी स्पर्धेचे आज पारितोषिक वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवस वर्षानिमित्ताने आयोजित प्रौढ महिला आणि पुरुष गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ रविवारी (दि. २२) सायंकाळी ६ वाजता पनवेलचे महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने उलवे नोडमध्ये ही जिल्हास्तरीय स्पर्धा खेळली जात आहे. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्ष म्हणून पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे आणि महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी सरकार्यवाह अॅड. आस्वाद पाटील, तर प्रमुख उपस्थिती अर्जुन पुरस्कार विजेत्या शकुंतला खटावकर व अभिलाषा म्हात्रे यांची असणार आहे.

उलवे नोड सेक्टर १२मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलजवळील रामशेठ ठाकूर मैदानावर होत असलेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील १८८ पुरुष कबड्डी संघ आणि ३२ महिला संघ सहभागी झाले आहेत. स्पर्धेत खेळाडूंकडून चमकदार कामगिरी पहायला मिळत आहे.

स्पर्धेचा रविवारी अंतिम दिवस असून त्याच दिवशी सायंकाळी पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे. या स्पर्धेचा कबड्डी रसिकांनी आनंद घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा राज्य कबड्डी असोसिएशनच्या कार्यवाह चित्राताई पाटील, मंडळाचे सचिव परेश ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, स्पर्धा संयोजन समितीचे सचिव शरद कदम यांनी केले आहे.

## निवडक

### भारत-ब्राझील द्विपक्षीय व्यापार करारावर शिक्कामोर्तब

**नवी दिल्ली** : भारत आणि ब्राझीलमधील द्विपक्षीय संबंधांत शनिवारी (दि. २१) एक नवा अध्याय जोडला गेला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुइज इनासियो लुला डी सिल्वा यांच्यात झालेल्या उच्चस्तरीय द्विपक्षीय चर्चेनंतर भारत-ब्राझील ट्रेड डीलवर अधिकृत स्वाक्षरी करण्यात आली. या करारामुळे व्यापार, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील सहकार्याला गती मिळेल.

### काँग्रेस नेते राहुल गांधी भिवंडी न्यायालयात हजर

**भिवंडी** : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मानहानीप्रकरणी दाखल याचिकेच्या सुनावणीसाठी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी शनिवारी (दि. २१) भिवंडी येथील न्यायालयात हजर झाले. या प्रकरणात राहुल गांधी यांनी यापूर्वी दिलेले जामीनदार माजी केंद्रीय मंत्री शिवराज पाटील-चाकूरकर यांचे निधन झाल्याने आता काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांचा जामीन देण्यात आला असून पुढील सुनावणी ४ एप्रिलला आहे.

## इंडिया एआय समिटमध्ये 'कुंभदूत' सादरीकरण



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नवी दिल्ली येथे आयोजित इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६मध्ये कुंभदूत या एजेंटिक एआय आधारित संकल्पनेचे सादरीकरण शनिवारी (दि. २१) करण्यात आले. नाशिकमध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना अधिक सोयीस्कर मार्गदर्शन व सहाय्य मिळावे या उद्देशाने ही संकल्पना मांडण्यात आली असून पुढील काळात या प्रणालीचा टप्प्याटप्प्याने कुंभदूत तंत्रज्ञानात उपयोग करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला माहिती व तंत्रज्ञानमंत्री अॅड. आशिष शेलार, बंदरे विकास व मत्स्यव्यवसायमंत्री नितेश राणे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, नाशिक विभागीय आयुक्त तसेच नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण प्रमुख डॉ. प्रवीण गेडाम आणि कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व तंत्रज्ञान तज्ज्ञ उपस्थित होते.

ही संकल्पना एजेंटिक कुंभ या मॉडेलवर आधारित आहे. याद्वारे सिंहस्थ कुंभमेळा २०२७मध्ये नोंदणीकृत प्रत्येक भाविकाला एक वैयक्तिक एआय सहाय्यक मिळणार आहे. या सहाय्यकाचे नाव कुंभदूत असेल. हा कुंभदूत भाविकाला प्रवास, निवास, घाटांची माहिती, आपत्कालीन मदत, पेमेंट, भाषांतर आदी बाबतीत मार्गदर्शन करेल. स्मार्टफोन असो वा साधा फीचर फोन, अगदी कॉल करूनही (आयव्हीआर प्रणालीद्वारे) भाविक या सेवांचा लाभ घेऊ शकतील. डिजिटल साक्षरता नसलेल्या किंवा वयोवृद्ध भाविकांनाही सोप्या आवाजाच्या माध्यमातून माहिती मिळेल.

या प्रणालीत कुंभ पास ही संकल्पनादेखील प्रस्तावित आहे. हा पास ऐच्छिक असेल आणि तो डिजीलॉकरमध्ये सुरक्षित स्वरूपात ठेवला जाईल. यामुळे प्रवेश प्रक्रिया, सेवा मिळविणे आणि आपत्कालीन परिस्थितीत मदत करणे अधिक सुलभ होईल.

## बदलापूरमध्ये स्त्रीबीज विक्री रॅकेटचा पर्दाफाश

### तिघींना अटक

**बदलापूर : प्रतिनिधी**

बदलापूर पूर्वेतील जोवेली परिसरात गरजू महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्या गर्भाशयातील स्त्री बीज (अंडी) वाढवून त्यांची बेकायदेशीर विक्री करणारे रॅकेट उघडकीस आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी तीन महिलांना अटक केली आहे.

जोवेली भागात नॅनो सिटी येथील एका इमारतीत सुलक्षणा गाडेकर यांच्या घरातून हे रॅकेट सुरू होते. पोलिसांनी उपजिल्हा रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योत्स्ना सावंत यांच्या वैद्यकीय पथकासह संयुक्त धाड टाकली. धाडीत आरोपीच्या घरातून स्त्री बीजांची वाढ करण्यासाठी वापरली जाणारी इंजेक्शन सापडली. गाडेकर ही गरजू महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांची सोनोग्राफी करून घेत असे आणि इंजेक्शन देऊन गर्भाशयात स्त्री बीजांची वाढ झाल्यानंतर त्या महिलांना आयव्हीएफ सेंटरमध्ये पाठवले जाई. तिथे शस्त्रक्रिया विभागात अंडी काढून त्यांची विक्री केली जात असे.

आरोपीच्या मोबाईलमध्ये गर्भधारणेसाठी लागणाऱ्या इंजेक्शनचे फोटो, सोनोग्राफीचे फोटो, खोट्या नावांची सत्यप्रतिज्ञापत्रे, बनावट कागदपत्रे तसेच आर्थिक व्यवहारांचे पुरावे आढळले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी सुलक्षणा गाडेकर (४४), अश्विनी चाबुकस्वार (२९) आणि मंजुषा वानखेडे (४६) या तिघींना अटक केली आहे. न्यायालयाने त्यांना २५ तारखेपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

## बारावीचे दोन पेपर फुटले, गुन्हा दाखल

**नागपूर** : बारावीच्या विज्ञान शाखेचे फिजिक्स आणि केमिस्ट्री विषयांचे पेपर परीक्षेपूर्वी व्हॉट्सअॅपवर आले. नागपूरमधील सेंट उर्सुला परीक्षा केंद्रावर हा प्रकार उघडकीस आला असून या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बारावीचा केमिस्ट्रीचा पेपर गुरुवारी होता, मात्र परीक्षेपूर्वीच हा पेपर विद्यार्थ्यांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर आला होता. सेंट उर्सुला केंद्रावर एक विद्यार्थिनी वारंवार प्रसाधनगृहात जात असल्याने तेथील पर्यवेक्षकांना संशय आला. महिला शिक्षिकेमार्फत तिची झडती घेतली असता तिच्याकडे स्मार्टफोन सापडला. तो जप्त करून तपासला असता एका व्हॉट्सअॅप ग्रुपवर परीक्षा सुरू होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका व्हायरल झाल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी तपास सुरू आहे.

## वर्ल्डकपमध्ये आज भारताची द. आफ्रिकेशी सुपर-८ लढत



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेचा थरार आता वाढला असून भारतीय संघ सुपर-८च्या महत्त्वाच्या लढतीसाठी सज्ज झाला आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात रविवारी (दि. २२) हाय-व्होल्टेज सामना रंगणार आहे.

यंदाच्या टी-२० वर्ल्डकपमध्ये भारताला दुखापतींचे ग्रहण लागले आहे. हर्षित राणाला दुखापत झाल्यामुळे शेवटच्या क्षणी मोहम्मद सिराजला संघात स्थान देण्यात आले. हर्षित हा संपूर्ण स्पर्धेलाच मुकला आहे. त्याची रिप्लेसमेंट म्हणून संघात आलेला सिराजने आतापर्यंत फक्त एकाच सामन्यात प्लेईंग ११मध्ये खेळला आहे. आता त्यालाही दुखापत झाल्याने संघ व्यवस्थापनाची डोकेदुखी वाढली आहे.

रेव्ह स्पोर्ट्सने दिलेल्या माहितीनुसार नेटमध्ये सराव करत असताना मोहम्मद सिराज हा हार्दिक पांड्याला गोलंदाजी करत होता. त्यावेळी हार्दिक पांड्याने एक जोरदार फटका मोहम्मद सिराजच्या दिशेने मारला. चेंडू थेट सिराजच्या गुडघ्याला जाऊन आदळला. त्यामुळे सिराज मैदानावर पडला. यानंतर सिराजला खूप वेदना होत असल्याने त्याने मैदान सोडले.

टी-२० वर्ल्डकपच्या यंदाच्या हंगामातील साखळी फेरीत भारतीय संघाने दिमाखदार कामगिरी करुन दाखवली. सलग चार विजयासह वर्ल्डकप स्पर्धेत सलग १२ विजय नोंदवण्याचा खास विक्रम टीम इंडियाने आपल्या नावे केला. आता सुपर ८-मध्ये भारतीय संघ अहदमबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर गत उपविजेत्या दक्षिण आफ्रिकेच्या संघाला भिडणार आहे.

## राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत रायगडातील खेळाडूंचे यश

### परेश ठाकूर यांच्याकडून कौतुक अन् बक्षीस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुणे, इंदापूर आणि जुन्नर येथे झालेल्या राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत रायगड जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी करत सहा खेळाडूंनी पदके पटकावली. इतक्या मोठ्या संख्येने पदके मिळण्याचे हे पहिलेच वर्ष असल्याची माहिती प्रशिक्षक पैलवान रूपेश पावशे यांनी दिली.

१५, १७ आणि २० वर्षाखालील विविध वजनी गटात खेळाडूंनी ही कामगिरी केली असून जिल्ह्याच्या कुस्ती परंपरेत हा अभिमानाचा क्षण मानला जात आहे. या यशाबद्दल पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा रायगड जिल्हा कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना रोख बक्षिसे दिली. सर्व गटातील खेळाडूंना प्रथम क्रमांकासाठी पाच हजार रुपये, द्वितीय तीन हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी दोन हजार रुपये तसेच प्रथम फेरी जिंकणाऱ्यांना एक हजार रुपये अशी बक्षिसे देण्यात आली.



यशस्वी सर्व कुस्तीपटूंनी शुक्रवारी पनवेल शहरातील भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात रायगड जिल्हा कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष परेश ठाकूर यांची भेट घेतली. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, प्रशिक्षक पैलवान रूपेश पावशे, समाधान आडके, क्षितिज म्हात्रे आदी उपस्थित होते.

स्पर्धेत १५ वर्षाखालील विविध वजनी गटात मुलींमध्ये ईश्वरी गळवे हिने द्वितीय, शौर्या कोळेकर, सानिका सत्रे, क्षितिजा मरागजे यांनी तृतीय, १७ वर्षाखालील गटात श्रुती दळवीने तृतीय आणि २० वर्षाखालील मुलांच्या गटात विराज घेरडे याने तृतीय क्रमांक प्राप्त केला. या यशामुळे रायगड जिल्ह्याच्या कुस्ती क्षेत्रातील कामगिरीला नवी उंची मिळाली असून सर्व स्तरातून खेळाडूंचे कौतुक होत आहे.

# कर्जतमध्ये दुचाकी चोरांची टोळी गजाआड

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील काही दुचाकींची चोरी झाली होती. कर्जत पोलिसांनी त्यापैकी नऊ दुचाकी हस्तगत केल्या असून तीन जणांच्या टोळीला गजाआड केले आहे. या दुचाकिंची किंमत चार लाख ७९ हजार ८०० रुपये आहे.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील कर्जत बाजारपेठेतील जुनी नगरपालीका येथील मोकळ्या जागेत हिरो होंडा कंपनीची सलेंडर प्लस दुचाकी नंबर एम.एन.०६ क्यु. ५०७६ दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी ०५.४० ते १७.३० वाजण्याचे चे सुमारास कोणी अज्ञात व्याक्तींनी चोरीकरुन नेल्याची घटना घडली होती. दुचाकीचे मालकांनी कर्जत पोलीस ठाण्यात दि.१५ फेब्रुवारी २०२६ रोजी दुचाकी चोरीला गेल्याची तक्रार दिल्या प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.



## पोलिसांकडून नऊ गाड्या हस्तगत

या गुन्हयाचा तपास रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक आँचल दलाल, अपर पोलीस अधिक्षक अभिजीत शिवथरे व कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे कर्जत पोलीस ठाण्याचे निरीक्षक उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत वरक, पोहेकॉ भोईर, पो. हे. कॉ. येरुणकर, पो. ना. नागरगोजे, पो. कॉ. घावस यांचे गुन्हे प्रकटीकरण पथक तयार करून घटनास्थळी येण्याच्या व जाण्याच्या मार्गावरील सी.सी.टि.व्हि. फुटेज बारकाईने तपासून तसेच प्राप्त सी.सी. टि.व्हि. फुटेजचा मागोवा घेत गोपनिय बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपींचा मागावा घेत या गुन्ह्यातील आरोपी प्रदिप चंद्रकांत कडू (वय २०, राहणार साळोख तर्फे निड ता. कर्जत जिल्हा रायगड) यास त्याचे रहात्या घरातून ताब्यात घेतले व त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने कसून चौकशी केली असता त्याने त्याच्या साथीदार आरोपी अरविंद राजू स्वामी (वय २३, रा. मॅगो ट्री. फार्म जांभिवली ता. कर्जत जिल्हा रायगड) याचेसह कर्जत पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ७८/२०२६ बी.एन.एस. २०२३ चे कलम ३०३ (२) हा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानंतर आरोपीत यांना गुन्हयाचे कामी अटक करुन त्यांना मा. न्यायालयात हजर केले व त्यांची पोलीस कोठडी घेतली तपासादरम्यान आरोपी प्रदिप चंद्रकांत कडू याने त्याचे अन्य दोन साथीदार आरोपी सचीन भानुदास भगत (वय १९, राहणार कुंडलज, ता. कर्जत जिल्हा रायगड) व आरोपी नरेश नारायण कराळे (वय २८, राह. देवगांव, मुरबाड जिल्हा ठाणे) यांची नावे सांगीतल्याने त्यांचा तांत्रीक विश्लेषणाद्वारे शोध घेऊन त्यांना १९ फेब्रुवारी २०२६ रोजी अटक करण्यात आली.

या आरोपींना मा. न्यायालयात हजर केले असता व देण्यात आलेल्या पोलीस कोठडीतील तपासादरम्यान आरोपपीना खालील पोलीस ठाण्याचे गुन्हयातील दुचाक्या चोरी केल्याची कबुली दिलेली आहे.

या गुन्ह्यातील अटक आरोपींनी दिलेल्या कबुलीनुसार कर्जत पोलीस ठाणे येथे सुपर स्प्लेंडर, हिरो होंडा स्प्लेंडर, बुलेट, किन्हवली पोलीस ठाणे येथे स्पलेंडर प्लस, मुरबाड पोलीस ठाणे येथे स्प्लेंडर प्लस, सुपर स्लेंडर, कुळगांव पोलीस ठाणे येथे ट्रिगर, शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा टि.व्हि.एस. आपाचे व बदलापूर पूर्व पोलीस ठाणे येथे गुन्हा बुलेट अशा चोरी केलेल्या एकूण चार लाख ७९ हजार ८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल असलेल्या नऊ दुचाकी हस्तगत केल्या आहे.

# मध्य रेल्वेच्या आपत्कालीन वैद्यकीय कक्षाला प्रतिसाद

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने आपल्या प्रवाशांना सुरक्षित आणि आरामदायी प्रवास सुनिश्चित करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. स्थानकांवर आपत्कालीन वैद्यकीय कक्ष (एचठ) स्थापन करणे हे आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय मदत पुरवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

मुंबई विभागाने तत्काळ वैद्यकीय मदत देण्यासाठी अनेक उपनगरीय स्थानकांवर आपत्कालीन वैद्यकीय कक्ष (EMR) स्थापन केले आहेत. अपघात, आजार किंवा इतर घटनांमुळे आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीला तोंड देणाऱ्या बोनाफाइड प्रवाशांना, ज्यामध्ये रेल्वे कर्मचारी देखील समाविष्ट आहेत, ह्यांना प्रथमोपचार सेवा प्रदान करणे हे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

भायखळा, कल्याण आणि वाशी स्थानकांवर आपत्कालीन वैद्यकीय कक्ष (EMR) आधीच कार्यरत आहेत. आणखी १० स्थानकांसाठी कंत्राटे देण्यात आली आहेत, ज्यामध्ये कळवा, टिटवाळा आणि कर्जत आधीच कार्यरत आहेत. लोकमान्य टिळक टर्मिनस, कुर्ला, घाटकोपर, ठाणे, मुंब्रा, मानखुर्द आणि चेंबूर या उर्वरित सात स्थानकांसाठी काम सुरू आहे.

या आपत्कालीन वैद्यकीय कक्ष (EMR) मध्ये मूलभूत जीवनरक्षक उपकरणे, ऑक्सिजन पुरवठा, स्ट्रेचर आणि औषधे आहेत, ज्यामध्ये उच्च शिक्षित डॉक्टर आणि प्रशिक्षित पॅरामेडिकल कर्मचारी २४ तास कार्यरत आहेत. पोर्टेबल लॅब, मेडिकल स्टोअर आणि रुग्णवाहिका सुविधादेखील उपलब्ध आहे.

मध्य रेल्वेने ही सेवा अधिक स्थानकांवर विस्तारित करण्याची योजना आखली आहे, मुंबई विभागातील ४४ स्थानकांसाठी निविदा काढल्या आहेत. या उपक्रमाचे उद्दिष्ट वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत प्रतिसाद वेळ कमी करणे, सुवर्णकाळात महत्त्वपूर्ण मदत प्रदान करणे आहे.

या सक्रिय दृष्टिकोनासह, मध्य रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि कल्याणासाठी आपली वचनबद्धता पुन्हा व्यक्त करते, सर्वांसाठी सुरक्षित आणि आरामदायी प्रवास सुनिश्चित करते.




**उरण : देशाची राजधानी दिल्ली येथे आयोजित ग्लोबल इंडिया एआय समिट या कार्यक्रमाच्या विरोधात युवक काँग्रेसने आंदोलन केले होते. त्यामुळे युवक काँग्रेसच्या विरोधात उरण चारफाटा येथे शिवसेना उरण विधानसभेच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला. या वेळी रायगड जिल्हाप्रमुख विनोद साबळे, संघटक महेंद्र पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख प्रितम सुर्वे, उरण शहरप्रमुख सुलेमान शेख, चंद्रकांत पाटील, समद भोंगले, बेबी ताई पाटील, अक्षय म्हात्रे, संदेश म्हात्रे, दिनेश पाटील, गणेश जळगावकर, रफिक शेख व शिवसैनिक उपस्थित होते.**

# अतिक्रमणविरोधी विभागातर्फे कोपरखैरणे विभागात कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व कैलास गायकवाड, उपायुक्त (अतिक्रमण) यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागात कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत ज्ञानेश्वर माऊली ओनर्स असोसिएशन, सेक्टर ७, कोपरखैरणे, नवी मुंबई येथील रहिवाशांकडून ११ फेब्रुवारी २०२६ रोजी ई-विभाग कोपरखैरणे येथे तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने अतिक्रमण विभागामार्फत स्थळ पाहणी केली असता सेक्टर ७, कोपरखैरणे येथील एस.एस. टाईप रूम नं ४६३ व एस.एस. टाईप रूम नं ४६५,मधील मोकळ्या भूखंडावर ५.५० मी द ६.६० मी एवढ्या क्षेत्रफळाचे पत्राशेड टाकून मंदिर बनविण्याचे काम चालू असल्याचे निदर्शनास आले आहे.

सेक्टर ०७, कोपरखैरणे येथील एस.एस. टाईप रूम नं ४६३ व एस.एस. टाईप रूम नं ४६५,मधील मोकळ्या जागेतील मंदिराची मागील भिंत व पुढील भिंतीवर निष्कासनाची तोडक कार्यवाही करण्यात आली. सदर अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते.

या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त भरत धांडे, कनिष्ठ अभियंता चंद्रकांत धोत्रे व इतर अधिकारी/कर्मचारी व न.मुं.म.पा पोलीस बंदोबस्त उपस्थित होते. तसेच सदर कारवाईसाठी पाच मजुरांचा व एक इलेक्ट्रॉनिक हॅमर, एक गॅस कटरचा वापर करण्यात आला. यापुढेदेखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# मेहेंदळे हायस्कूलमध्ये शिवजयंती

**नागोठणे : बातमीदार**

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती ९ फेब्रुवारी रोजी रोहा येथील मेहेंदळे हायस्कूलच्या भव्य पटांगणावर विद्यार्थ्यांच्या वतीने शिवकालीन विविध कार्यक्रम सादर करत प्राचार्य रमेश मोसे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

यावेळी प्राचार्य रमेश मोसे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. यावेळी त्यांच्यासोबत ज्येष्ठ शिक्षक विलासराव जाधव, के आर पाटील, संग्राम गायकवाड, नारायण पानसरे तसेच एनसीसी कमांडर संदीप चांदोरकर व इतर सेवकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे औचित्य साधून एनसीसी कमांडर संदीप चांदोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी ट्रूपच्या वतीने राजे छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय या घोषणेने सारा परिसर विद्यार्थांनी दणाणून सोडला. त्यानंतर शिवकालीन वेशभूषेत आलेल्या विद्यार्थ्यांनी गारद, पोवाडे, शिवगीते, नृत्य तसेच गड आला,पण सिंह गेला ही नयनरम्य नाटिका सादर करून उपस्थित पालक वर्गाचे तसेच विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत पाणी आणले.

याचबरोबर विद्यार्थ्यांनी लाठीकाठी, मल्लखांब, तलवारबाजी आदी खेळ सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण पानसरे यांनी केले तर फलक लेखन सुनील दाभाडे यांनी केले.



# मुरुडमध्ये महाराजस्व समाधान शिबिर होणार

**मुरूड : प्रतिनिधी**

महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावर ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयातील तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन गुरुवारी ५ मार्च, शनिवारी ७ मार्च, शनिवारी १४ मार्च, शुक्रवार १० एप्रिल, शुक्रवार १७ एप्रिल या दरम्यान तालुक्यातील मंडळ स्तरावर तर शुक्रवार ८ मे, शुक्रवार १५ मे २०२६ रोजी करण्यात आले आहे.

सर्वसामान्य जनता व शेतकरी यांचे महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांशी संबंधित दैनंदिन प्रश्न सत्वर निकाली काढणे, महाराष्ट्र जमिन महसूल संहितेच्या नवीन तरतुदींची जनजागृती करणे/प्रभावी अंमलबजावणी करणे, डिजिटल सेवांचा जास्तीत जास्त वापर सुनिश्चित करणे, नागरिकांना एका दिवसात सेवा वितरण व्दारा सेवा पुरविणे या उद्देशाने माहे मार्च ते माहे मे या कालावधीमध्ये राज्यात महसूल मंडळ स्तरावर तसेच नगर परिषद/नगर पंचायत पातळीवर छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियान टप्पा क्र.१ राबविण्याबाबत शासन निर्णय झाला आहे.

प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क, लोकसेवा हक्क कायदा-तत्काळ सेवा, अकृषिक तरतुदीसंदर्भातील सुधारणा बाबत मार्गदर्शन करणे, भूसंपादन केलेल्या व अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्ययावत करणे, असे समाधान शिबिरांतर्गत सर्वसामान्य जनतेला उपलब्ध करून द्यावयाच्या सेवा आहेत. छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियान टप्पा क्र.१ अंतर्गत घेण्यांत येणाऱ्या शिबिरामध्ये तालुक्यातील सर्व नागरिकांनी, महिलांनी, विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार आदेश डफळ यांनी केले आहे.

# वनसमितीच्या माध्यमातून स्वच्छता राखण्यास मदत

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान नगर परिषदेच्या सत्ताधारी गटाच्या माध्यमातून वन संरक्षण समिती कार्यरत असते. सत्ताधारी गटाच्या मर्जीतील विश्वासू कार्यकर्ते या समितीवर उत्तम प्रकारे विकास कामे करण्यासाठी नेहमीच सज्ज असतात. एकूण २० सदस्यांची या समितीवर निवड केली जाते. जोपर्यंत सत्ताधारी गट नगर परिषदेच्या सभागृहात अस्तित्वात असतो तोवर नेमून दिलेले कार्यकर्ते यामध्ये पन्नास टक्के महिला सदस्य असतात.

दस्तुरी वाहन पार्किंगच्या माध्यमातून दरवर्षी लाखो रुपयांचे उत्पन्न या समितीला प्राप्त होते. त्यातूनच काहीवेळा वृक्षारोपण, ठराविक पॉईंट्सची सुरक्षा व्यवस्था, कचराकुंडी लावणे अशी महत्त्वपूर्ण कामे समितीचे पदाधिकारी, सदस्य करीत असतात. विशेष म्हणजे ही सर्व मोठया रक्कमेची कामे करताना कोणत्याही प्रकारची निविदा प्रक्रिया पूर्ण केली जात नाही. समितीचे पदाधिकारी, सदस्य यांच्या सामोपचारातुन कामे पूर्ण करून गावाच्या विकास कामात मदत होत असते.

लाखो रुपयांची शिल्लक आजही जमा असल्याने यावेळी गावातील एकूण पाच गरजवंत महिलांना स्वच्छता कामे दिली आहेत. याकामी दर महिन्याला साठ ते सत्तर हजार रुपये पगाराच्या रूपाने या पाच महिलांना दिला जात आहे. प्लास्टिक मुक्ती त्याचप्रमाणे अन्य कचरा गोळा करण्यासाठी वन संरक्षण समितीने पुढाकार घेतला असून स्वच्छता राखण्यासाठी मदत होत आहे.



यापुढे नव्याने स्थापन होणाऱ्या समितीवर सत्ताधारी गटाने बारकाईने लक्ष केंद्रित करून गावाच्या हिताच्या दृष्टीने जी काही लाखो रुपयांची शिल्लक रक्कम आहे त्याचा सदुपयोग विकास कामांसाठी करावा, अशी स्थानिकांमधून मागणी केली जात आहे.

# भाल विठ्ठलवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील पश्चिमेकडे निसर्गरम्य समुद्रकिनारा लाभलेल्या तीर्थक्षेत्र भाल- विठ्ठलवाडी या विठू-माऊलीच्या गावामध्ये दरवर्षीप्रमाणे विनायक चतुर्थीचा शुभमुहुर्त आणि शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०२६ (फाल्गुन शु. ५) रोजी ते ते रविवार (फाल्गुन शु. १३) दि.१ मार्च २०२६ पर्यंत टाळ-मृदुंगाच्या गजरात भाल विठ्ठलवाडी येथे विठ्ठल रखुमाई अखंड हरिनाम सप्ताह होत आहे. या नऊ दिवसांमध्ये कीर्तने, सकाळी पहाटे काकड आरती, ज्ञानेश्वर पारायण, सामुदायिक हरपाठ, सांज आरती, सकाळ- संध्याकाळ प्रदक्षिणा, प्रवचन, अभंग गाथा, भजन, भारुड, हरि जागर सादर होणार आहेत.

पंचक्रोषित पर्वणी समजल्या जाणार्या विठ्ठल रखुमाईचा छबिना १ मार्च रोजी रात्रौ ९.०० वाजता निघणार आहे. उत्कृष्ट ध्वनीक्षेप, फटाक्यांची आतिषबाजी पहायला मिळणार आहे. नवनवीन सामाजिक बांधिलकी जोपासणारे उपक्रम-कार्यक्रम, बोध देणारे पौराणिक देखावे सादर केली जाणार आहेत.



२१ फेब्रुवारी रोजी प्रवचन, हभप हिराजी महाराज शिवकर कळवणे यांचे कीर्तन होणार आहे. रविवार, २२ फेब्रुवारी रोजी पेण पनवेल रेल्वे प्रवाशी भजन मंडळ यांचे भजन, रात्रीं हभप प्रविण महाराज फरार यांचे कीर्तन होईल. सोमवार, २३ फेब्रुवारी रोजी हनुमान प्रासादिक भजन मंडळ बेलकडे यांचे भजन हभप प्रमोद म्हात्रे बोरी यांचे रात्री किर्तन, मंगळवार २४ फेब्रुवारी हभप यश महाराज बडेकर कर्जत यांचे गीता पारायण, नंतर नवव्या व बाराव्या ज्ञानेश्वरी अध्यायाचे वाचन, ह भ प उषा ठाकूर यांचे प्रवचन, रात्रीं हभप नितीन महाराज माळी यांचे कीर्तन होईल.

बुधवार, २५ फेब्रुवारी दत्तगुरु प्रासादिक भजन मंडळ यांचे भजन होईल. ह भ प तुळशीदास महाराज रसाळ पंढरपूर यांचे कीर्तन होईल. गुरुवार, २६ फेब्रुवारी रोजी कुलदैवत भजन मंडळ कुटुंब आणि भाल यांचे भजन, हभप ज्ञानेश्वर महाराज डोलवी यांचे प्रवचन, हभप दत्तात्रय महाराज ढेने आंबेगाव पेण यांचे कीर्तन होईल. शुक्रवार २७ फेब्रुवारी रोजी सकाळी दिंडी सोहळा, धीरज महाराज डोळवी यांचे प्रवचन, शनिवारी २८ फेब्रुवारी सकाळी दहा वाजता हभप संकेत भोळे यांचे पुष्पावृष्टीचे हरिदासि किर्तन होईल. तबला साथ जितेंद्र म्हात्रे, हार्मोनियम साथ समाधान म्हात्रे यांची लाभेल.

पेण तालुक्यात प्रसिद्ध असलेली चलचित्र देखाव्याची पालखी दहा वाजता निघेल. रविवारी १ मार्च रोजी सकाळी आठ वाजता ह भ प भोळे महाराज यांचे पादुका पूजनाचे हरिदासी कीर्तन रात्र दहा वाजता मदन राजवाडे लिखित लग्नाआधी वरात हे नाटक होईल.

या विठूमाऊलीच्या सेवेसाठी गावातील नवनिर्वाचित, अजिमाजी विठ्ठल रखुमाई ट्रस्ट, विठ्ठलरखुमाई हरिपाठ मंडळ, विठ्ठलवाडी मोठेभाल पंचक्रोषी हरिपाठ वारकरी मंडळ,विठ्ठलरखुमाई भजन मंडळ, कुलदैवत भजन मंडळ, पंचक्रोशी भजन मंडळ, विठ्ठलवाडी ग्रामस्थ मंडळ, पंचक्रोशीतील ग्रामस्थ, तरुणवर्ग,महिलावर्ग-बचतगट सामाजिक - शासकिय, राजकिय ,शैक्षणिक संस्था, कर्मचारी मंडळ,टेम्पो, टाटा मॅजिज, इको, अॅटोरिक्षा, बैलगाडी-ट्रॅक्टर चालक-मालक, विद्युत AST, टॅकर- पाणी-विभाग, महामंडळ-कर्मचारी, सर्व पत्रकार बंधू सहभाग घेऊन चरणी विलिन होत असतात.

सर्वांनी भक्तीचा महिमा पाहण्यसाठी व महाप्रसाद घेण्यासाठी उपस्थित रहावे असे ग्रामस्थांच्या वतीने नवनिर्वाचित, आजी-माजी विठ्ठल रखुमाई ट्रस्ट, ग्रामस्थ-मंडळ भाल-विठ्ठलवाडी, याजकडून भक्तीपुर्ण आवाहन केले आहे.

## दुखवटा

### विजया वाडेकर



**नागोठणे :** माजी तहसीलदार रघुनाथ वाडेकर यांच्या पत्नी विजया वाडेकर (वय ९०) यांचे १६ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, पाच मुली, जावई, सून, नातवंडे, पंतवंडे असा मोठा परिवार आहे. कै. विजया वाडेकर यांचा दशक्रिया विधी बुधवारी (दि.२५) नाशिक येथे तर उत्तरकार्य शनिवारी (दि.२८) नागोठणे येथील निवासस्थानी होणार असल्याची माहिती वाडेकर कुटुंबियांकडून देण्यात आली आहे.

### पांडुरंग पिंगळे



**चौक :** वारकरी संप्रदायाचे घोडिवली परिसरातील प्रमुख हभप पांडुरंग गोपाळ पिंगळे (वय ८३) यांचे निधनाने झाले. त्यांच्या पश्चात चार मुलगे, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. पांडुरंग पिंगळे यांचे उत्तरकार्य मंगळवारी (दि.२४) घोडीवली येथे राहत्या घरी होणार आहेत.

# उरणमध्ये वानरे, गुरांकडून कडधान्याची नासधूस

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर, कळंबुसरे, पुनाडे, साई, दिघाटी, नागाव, केगाव यासह विविध गावातील, शेतकरी वर्गाने आपापल्या शेतात लागवड केलेल्या कडधान्य पिकास चांगलाच बहर आल्याने, शेतकरी वर्ग पुरता समाधानी झाला असला तरी जंगली वानरे व रानटी मोकाट गुरांच्या हैदोसामुळे येथील शेतकरी वर्ग पुरता चिंतेत पडला आहे.




गुरांना पांगविण्यासाठी रात्रीचा जागता पहारा द्यावा लागत आहे. दीपावली सणानंतरही परतीचा पाऊस कायमच सक्रिय राहिल्याने शेतीमध्ये कडधान्य पिकांच्या लागवडीस बराच विलंब झाल्याने, चालू हंगामात कडधान्य पिकांबाबत थोडीशी साशंकतच होती, परंतु आपली शेती ओसाड ठेवून वाया घालविण्यापेक्षा शेतकरी वर्गाने वेळ उशिरा आपापल्या शेतात कडधान्य पिकांची लागवड केली. हि कडधान्य पिके चांगलीच बहरली असल्याचे पहावयास मिळत आहे, तर डिसेंबर जानेवारीमध्ये पडणाऱ्या दवबिंदूमुळे कडधान्य पिके फोफावली त्यातच अधूनमधून पडणारे धुकेही पिकांच्या लागवडीस पोषक ठरत असल्याचे विभागातील शेतकरी कृष्णा म्हात्रे, शंकर केणी, गजानन केणी, काशिनाथ घबाडी चंद्रकांत म्हात्रे, रमाकांत म्हात्रे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शेतकरी वर्गाने आपआपल्या शेतात वाल, चवळी, हरभरे, मूग, मटकी, तूर, घेवडा आदी कडधान्य पिके घेतली आहेत. तर वेळ उशिरा की होईना सद्यस्थितीत कडधान्य पिके चांगलीच बहरली आहेत. तर चवळी, मूग, वाल व मटकीची पिके तयार होऊ लागली आहेत.

दरम्यान, पुढील काही दिवसांनी सर्वच कडधान्य पिके तयार होतील. मात्र रानटी उनाड गुरांच्या व जंगली वानरांच्या त्रासामुळे शेतकरी वर्ग चिंतेत पडला असून, गुरे व वानरांच्या तावडीतून कडधान्य पिके वाचली तर अखेरच्या मोसमापर्यंत सर्वच पिकातून चांगले उत्पादन मिळेल, अशी अशा शेतकरी वर्गाला वाटू लागली आहे.

# तीन शैक्षणिक संकुलांना स्काफचे ए प्लस मानांकन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य शैक्षणिक संशोधन परिषद महाराष्ट्र पुणे अंतर्गत राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांसाठी शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखड्याची (स्काफ) निर्मिती करण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५मध्ये महाराष्ट्र राज्यातील १,०२६६५ शाळांनी या अंतर्गत स्वयं मूल्यांकन पूर्ण केले होते. या सर्व शाळांमधून १०६४४ शाळांची निवड होऊन शैक्षणिक वर्ष २०२५- २६ मध्ये त्यांनी बाह्य मूल्यांकनही पूर्ण केले होते. स्काफने केलेल्या या दोन्ही मूल्यांकनानुसार नवीन पनवेल येथील सीकेटी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तसेच रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते रामशेठ ठाकूर प्रायमरी स्कूल व रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते रामशेठ ठाकूर ज्युनि. कॉलेज कामोठे या तीनही विद्यालयास स्काफचे ए+ मानांकन प्राप्त झाले आहे. स्काफतर्फे या तीनही शाळांच्या मुख्याध्यापकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

या तीनही शाळांना मिळालेल्या स्काफच्या ए+ मानांकनाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी.गडदे यांनी तीनही शाळांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, पर्यवेक्षक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

# सराईत मोबाईल चोरटा गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर परिसरात मोबाईल चोरी करणाऱ्या एका सराईत गुन्हेगारा पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेवून त्याच्याकडून मोबाईल चोरीचे चार गुन्हे उघडकीस आणले आहेत.



गेल्या काही दिवसांपासून पनवेल बस स्थानक परिसरात प्रवाशांचे मोबाईल चोरीस जाण्याचे प्रमाण वाढले होते. त्यासंदर्भात वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रविण फडतरे, पोहवा संदेश म्हात्रे, तुषार बोरसे, अमोल पाटील, मिथुन भोसले, विशाल दुधे, सचिन कोर, किरण कराड आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी कलीम रशीद शेख, (वय ३१, रा.कोपरखैरणे) या सराईत मोबाईल चोरट्यास ताब्यात घेतले असता त्याच्याकडून या परिसरात त्याने चोरलेले चार मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत. त्याच्या अटकेमुळे अजूनही मोबाईल चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे.

# बेकायदेशीररित्या विक्रीसाठी गांजा जवळ बाळगल्याप्रकरणी कारवाई

**पनवेल :** बेकायदेशीररित्या गांजा जवळ बाळगून त्याची विक्री केल्याप्रकरणी एका महिलेला पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेवून तिच्याकडून जवळपास नऊ हजार रुपये किंमतीचा गांजा हस्तगत केला आहे.

तालुक्यातील अजिवली गाव परिसरात असलेल्या एका हॉटेलमध्ये तसेच किराणा दुकानात एक महिला बेकायदेशीरित्या गांजा विक्रीसाठी ठेवत असल्याची माहिती वपोनि गजानन घाडगे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने छापा टाकला. या ठिकाणावरून महिलेला ताब्यात घेवून जवळपास नऊ हजार रुपये किंमतीचा गांजा हस्तगत केला आहे व तिच्याविरोधात एनडीपीएस कायदा कलम ८ (क), २० (ब), २२ अन्वये कारवाई केली आहे.

# दुर्ग मावळा प्रतिष्ठानतर्फे शिवजन्मोत्सव साजरा

**उरण : बातमीदार**

दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण विभागातर्फे द्रोणागिरी किल्ला येथे शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दोन ते तीन महिने आधीपासून गड स्वच्छता व संवर्धनाची तयारी करण्यात आली. १८ फेब्रुवारी रोजी गडाची सजावट करून विमला तलाव येथे शिवप्रतिमेचा अभिषेक, मशाल फेरी व सहभोजन पार पडले.



१९ फेब्रुवारी रोजी बालशिवरायांच्या अंगाई गीताने कार्यक्रमास प्रारंभ झाला. उरण बाजारपेठेतून पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. टिमकी वाद्य आणि बालशिवरायांच्या वेशातील मावळा हे विशेष आकर्षण ठरले. गडावर पारंपरिक पूजन व भंडाऱ्याने जल्लोष करण्यात आला.शिवगर्जना शाहीर पथकाचे युवाशाहीर अभिषेक पाटील व सहकाऱ्यांच्या जोशपूर्ण पोवाड्यांनी वातावरण भारावून गेले. राजांचे विचार जपायचे असतील तर गड-कोट टिकवले पाहिजेत, हा संदेश त्यांनी दिला.

शेकडो शिवप्रेमी उपस्थित होते. लहान मावळ्यांना शिववस्त्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. अध्यक्ष शेखर भोमकर व उपाध्यक्ष विवेक केणी यांच्या मार्गदर्शनाखाली सोहळा यशस्वी पार पडला. कार्यक्रमाचे निवेदन राजेंद्र ठाकूर यांनी केले.

# ‘हिंद-दी-चादर’बाबत विविध समाजांची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त खारघर येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या कार्यक्रमानिमित्त विविध समाजातील जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे यासाठी पनवेल महापालिका मुख्यालयात आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, मुख्यमंत्री कार्यालयाचे समन्वयक डॉ. रीतेश पाटील आणि सहकारी यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.



या बैठकीस शीख, बंजारा, लबाना, मोहियाल, वारकरी संप्रदाय, सिंधी, सिकलकरी समाजातील प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी हिंद-दी-चादर कार्यक्रमाबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती दिली तसेच सर्व समाजबांधवांचा, समाजातील सर्व गटांचा कार्यक्रमासाठी सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने चर्चा झाली.

या कार्यक्रमासाठीचा वाहतूक मार्ग, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता व्यवस्था, कार्यक्रमाची प्रचार प्रसिद्धी इत्यादी विषयांवर यावेळी चर्चा झाली. मुख्यमंत्री कार्यालयाचे समन्वयक डॉ. रीतेश पाटील आणि सहकारी यांनी देखील उपस्थित समाजाच्या प्रतिनिधींना हिंद-दी-चादर कार्यक्रमाबाबत मार्गदर्शन व चर्चा केली. या बैठकीस पनवेल महानगरपालिका उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त स्वरूप खारगे, विविध समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

> **खारघर येथे होणाऱ्या अत्यंत भव्य आणि ऐतिहासिक कार्यक्रमासाठी प्रशासन पूर्ण क्षमतेने कार्यरत असून जास्तीत जास्त नागरिकांच्या सहभागासाठी पनवेल महापालिका प्रयत्नशील आहे.**
> **-मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महापालिका**

# आचार्य बाळशास्त्री जांभेकरांना जयंती निमित्ताने अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात शुक्रवारी (दि.२०) पत्रकारीतेचे जनक, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्ताने आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



या वेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी, उपायुक्त मंगला माळवे, उपायुक्त स्वरूप खारगे, उपसचिव अक्षय कदम, जनसंपर्क अधिकारी नितीन साके, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी ‘रयत’चे रायगड विभागीय पीआरओ बाळासाहेब कारंडे, प्राचार्य अविनाश कुलकर्णी तसेच प्रियंका बांगर आदी उपस्थित होते.**

# उलवे येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे येथे १९ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराजयांची जयंती शाळेच्या परिसरात अत्यंत श्रद्धा व उत्साहात साजरी करण्यात आली.

सुरुवात आरटीपीएस, उलवेचे चेअरमन भार्गव ठाकूर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर दीपप्रज्वलन करून महान मराठा योद्धा, कुशल प्रशासक आणि दूरदर्शी नेत्यास विनम्र अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी महाराजांच्या कार्याची आणि त्यांच्या स्वराज्य स्थापनेच्या अद्वितीय पराक्रमाची आठवण करून दिली.



कार्यक्रमासअॅड. राहुल घरत, सदस्य, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था तसेच किरण कुमार सुथार, प्राचार्य, आरटीपीएस, उलवे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शिवगर्जना व घोषवाक्यांनी वातावरण दुमदुमून गेले. उपस्थितांनी महाराजांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या आदर्शांचे पालन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या कार्यक्रमाने श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या अमर कार्याची, राष्ट्रनिर्मितीसाठी दिलेल्या महान योगदानाची आणि स्वराज्याच्या पवित्र संकल्पनेची पुन्हा एकदा उजळणी करून दिली.

# शिवजयंतीनिमित्त कामोठे येथे भव्य देखावा

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे परिसरातील काही उत्साही तरुण गेल्या सहा वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवजयंती घरगुती स्तरावर अत्यंत प्रेरणादायी आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरी करत आहेत. यावर्षी त्यांनी ‘केदारेश्वर’ या ऐतिहासिक व आध्यात्मिक महत्त्व असलेल्या विषयावर भव्य देखावा साकारला. सह्याद्रीच्या कड्यावर वसलेले केदारेश्वर मंदिर याची प्रतिकृती इको-फ्रेंडली साहित्य वापरून तयार करण्यात आली.



नैसर्गिक दगडी रचना, गुहेसारखा परिसर आणि ऐतिहासिक वातावरण यांचे वास्तवदर्शी सादरीकरण करून उपस्थितांचे लक्ष वेधले. या उपक्रमाची विशेष बाब म्हणजे संपूर्ण सजावट पर्यावरणपूरक असते. प्लास्टिक व थर्माकोलचा वापर टाळून कागद, कापड, लाकूड व इतर नैसर्गिक साहित्याचा उपयोग केला जातो. मागील वर्षांच्या मॉडेलमधील साहित्याचा पुनर्वापर करून नव्या संकल्पनेतून देखावा उभारण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत साधेपणातही भव्यता दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

सिद्धेश बोडस, सोहन बोडस, संकेत कदम, सिद्धेश कदम, सुजल यादव, अभिषेक यादव आणि साईराज गायकवाड हे तरुण कॉलेज व पार्ट-टाईम नोकरी सांभाळून उरलेल्या वेळेत नियोजन, अभ्यास, माहिती संकलन आणि देखाव्याची उभारणी करतात. गेल्या सहा वर्षांपासून ही शिवजयंती स्मिता बोडस यांच्या घरात साजरी होत आहे. त्यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे आणि पाठबळामुळे हा उपक्रम सातत्याने यशस्वीपणे पार पडत आहे. घरातून मिळालेल्या संस्कारांमुळेच हे तरुण शिवजयंतीला केवळ उत्सव न ठेवता एक सामाजिक संदेश देणारा उपक्रम बनवत आहेत.

डीजे व केवळ घोषणांपुरते मर्यादित न राहता, शिवजयंतीच्या माध्यमातून महाराजांचा खरा संदेश स्वराज्य, शौर्य, स्त्री-सन्मान आणि लोककल्याण समाजापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला जातो. उपस्थितांना ऐतिहासिक माहिती आणि प्रेरणादायी संदेश देण्यात येतात.

# एआय समिटमध्ये ‘जेबीएसपी’चे अॅड. राहुल घरत यांचा सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे (जेबीएसपी) सदस्य अॅड. राहुल घरत यांनी नवी दिल्ली येथे आयोजित द इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ला भेट दिली. शाळा व महाविद्यालयांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घेणे आणि भविष्यातील शैक्षणिक दिशा समजून घेणे हा या भेटीचा मुख्य उद्देश होता.

या एक्स्पोमध्ये सर्व्हिंग फूड रोबोट्स, नृत्य करणारे ह्युमनॉइड रोबोट्स, सर्व्हिलन्ससाठी वापरले जाणारे रोबोटिक डॉग्स, शस्त्रक्रियेसाठी उपयुक्त रोबोटिक आर्म, एआय-आधारित कार व बाईक्स अशा अनेक आधुनिक तंत्रज्ञानाचे सादरीकरण पाहण्यात आले. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील झपाट्याने होत असलेली प्रगती आणि तिचा शिक्षण क्षेत्रावर होणारा परिणाम प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी मिळाली.

या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रदर्शनाला विविध देशांतील राजनैतिक प्रतिनिधी (डिप्लोमॅट्स) उपस्थित होते, ज्यामुळे कार्यक्रमाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले. शिक्षण संस्थांमध्ये एआय, रोबोटिक्स आणि डिजिटल लर्निंगच्या संकल्पना प्रभावीपणे राबविण्यासाठी या भेटीतून महत्त्वपूर्ण दिशा मिळाल्याचे अॅड. राहुल घरत यांनी सांगितले.

भविष्यातील पिढीला जागतिक स्तरावर सक्षम बनविण्यासाठी शिक्षण क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करणे आवश्यक असून ही भेट अत्यंत प्रेरणादायी व उपयुक्त ठरली. भारत तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने प्रगती करत आहे आणि अशा उपक्रमांमुळे देशाच्या विकासाला नवी गती मिळत आहे.

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंचे सभागृह उभारण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनतर्फे पनवेल शहरात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने भव्य सभागृह व भवन उभारण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त कैलास गावडे यांना सादर करण्यात आले.

संस्थेच्या पदाधिकार्यांनी निवेदनात नमूद केले की, शिक्षणासाठी आयुष्य वेचणार्या सावित्रीबाई फुले यांचे पनवेल शहरात अद्याप कोणतेही सभागृह किंवा स्मारक भवन उभारण्यात आलेले नाही. शिक्षण प्रसारासाठी ज्योतिराव आणि सावित्रीबाई फुले यांनी केलेले कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. दलित, शोषित आणि वंचित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. या महान समाजसुधारकांच्या सन्मानार्थ पनवेलमध्ये महापालिकेने योग्य भूखंड निश्चित करून ठराव मंजूर करावा आणि त्यांच्या नावाने भव्य सभागृह उभारावे, अशी संस्थेची मागणी आहे.

अर्जाची दखल घेऊन यावर तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती संस्थेच्या वतीने करण्यात आली. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा रुपाली शिंदे, स्नेहा धुमाळ, प्रिया गंगावणे, ज्योती तातरे, सुषमा मयेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.



# सेलिब्रिटीजची लग्ने गाजायला हवीतच...

विजय देवरकोंडा आणि रश्मिका मन्दाना यांनी आपल्या हाय प्रोफाईल लग्नाच्या कव्हरेजच्या प्रक्षेपणाची साठ कोटीची ऑफर नाकारली म्हणजेच त्यांना आपल्या लग्नाची किंमत याहीपेक्षा अधिक आहे हे लक्षात आले असेल. सेलिब्रिटींच्या भोवतीचे जग त्यांच्या लग्नातील एकेक गोष्ट जाणून घेऊ इच्छित तर मग त्याला भारी दाम मिळणारच.

## झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

अशा वेळी लग्न होऊ घातलेल्या अशा मनोरंजन क्षेत्रातील व्यवहारी चेहरे मोहरे आपल्याही साखरपुडा, हळद, संगीत , लग्न, उखाणा, रिसेप्शन, आहेर या सगळ्या पॅकेज कव्हरेजला चांगला भाव मिळावा यासाठी प्रयत्नशील राहिले तर आश्चर्य वाटायला नको. सेलिब्रिटीज मॅनेजमेंटला आणखी एक मोठीच संधी. लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात असे कितीही खरं असले तरी आता मनोरंजन क्षेत्रात तरी त्या व्यावहारिक दृष्टिकोनातून जुळवल्या वा जुळल्या जातात. सेलिब्रिटींजनी कव्हरेजला पैसे मोजण्याऐवजी यू ट्यूब चॅनेल्सनी सेलिब्रिटींजना कव्हरेजसाठी किंमत द्यावी असा हा खेळ मेळ आहे.

सेलिब्रिटींच्या लग्नाच्या स्पॉन्सरशीपपासून नवरीचे मंगळसूत्राचा नामांकित ज्वेलर्स, त्यांचा साखरपुडा आयोजित केलेली ट्रॅव्हल एजन्सी, तिकडच्या एक्सलुझिव्ह फोटोंची किंमत असे अनेक व्यावहारिक फाटे फुटत आणि जोडत आता सेलिब्रिटीजची लग्ने ठरवली जाण्याच्या विक्री मूल्य असलेल्या युगात आपण पोहचलोय. मन आणि विचार जुळवण्यापेक्षा व्यावहारिक दृष्टिकोन जुळायला हवा हे कार्पोरेट युगाचे मोठेच देणं.

सिनेमावाल्याची लग्ने हा एका कलरफुल वेबसिरीजचा मसाला मिक्स विषय. त्यात उत्कंठावर्धक वळणावर बरेच काही घडलंय. त्यातील टिकली किती, कोणती, कशी आणि का हे त्यातील उपकथानक. तरी आपण कलाकारांच्या यशस्वी संसार गोष्टी जरी पाहिल्या तर त्यातही गोष्टी अनेक. त्यात काही आजूबाजूला काही फाटे फुटलेही असतील, पण तो चित्रपटसृष्टीतील वातावरणाचा, सततच्या सहवास लाभल्यामुळे झालेला परिणाम असावा असा आपण निष्कर्ष काढू शकतो. गॉसिप्स मॅगझिनमधून त्यावर किती आणि कसे रंगवून, खूलवून, वाढवून, शिजवून लिहिले गेले आणि ते सगळे रूजलं ही शस्त्रक्रिया आता अवघड आहे. फरक इतकाच की चित्रपटसृष्टीतील अनेक प्रेम प्रकरणे चित्रपटाइतकीच गाजली.









राज कपूर विवाहित असूनही नर्गिसजी त्याच्या दिग्दर्शनातील चित्रपटासह त्याच्या आयुष्याचाही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष भाग झाल्या हे सतत सांगितले जाते. राज कपूरच्या दिग्दर्शनातील चित्रपटात नर्गिसजी सहज वावरताना दिसतात. सुनील दत्त आणि नर्गिस दत्त हे आदर्श दाम्पत्य आहे. ते ऋषि कपूर आणि नीतू सिंग यांच्या लग्नाच्या स्वागत समारंभात आले तेव्हा नर्गिस किती वर्षांनी कपूर खानदानातील सोहळ्यात सहभागी झाल्या ही बातमी झाली. राजीव कपूर दिग्दर्शित 'प्रेम ग्रंथ' या चित्रपटासाठी संजय दत्तची निवड होताच पुन्हा तेच, नर्गिसजीचा आर.के. फिल्ममधील वारसा असा पुढे सुरू असे म्हटले गेले. काही कारणास्तव संजय दत्तला हा चित्रपट सोडावा लागला. कपूर खानदानाची गोष्ट सांगताना हे सगळेच त्यात येते.

दिलीपकुमारचे सायरा बानूशी लग्न झाले हा त्या काळातील सांस्कृतिक धक्काच होता. राजेंद्रकुमार सायरा बानूत विशेष रस घेत असतानाच ती दिलीपकुमारची पत्नी झाली. तोपर्यंत एखाद्या चित्रपटात एकत्र काम करण्याचा योग त्यांना आला नव्हता, तो त्यानंतर 'गोपी' (१९७०) पासून आला. अशातच १९८२ साली दिलीपकुमारने हैदराबाद येथील अस्मा हिच्याशी केलेले दुसरे लग्न अल्पायुषी ठरले.

राजेश खन्ना आणि अंजू महेंद्र यांच्या घट्ट मैत्रीचे किस्से नाक्यावर, अड्ड्यावर, गच्चीत गाजत असतानाच राजेश खन्नाने डिंपल कपाडियाशी अचानक लग्न केले आणि सामाजिक सांस्कृतिक माध्यम क्षेत्रात उलटसुलट प्रतिक्रिया उमटली. 'बॉबी' चित्रपटाचा क्लायमॅक्स चित्रीत होण्यापूर्वीच असा टर्न आणि ट्विस्ट आला. राज कपूरचे फाईड म्हणून डिंपल कपाडिया फोकसमध्ये होती. अशातच ती श्रीमती राजेश खन्ना झाल्याने मोठाच आश्चर्याचा धक्का बसला. सगळ्यांनाच एकदम चकमा देणे म्हणजे काय ते हे होते. अन्जू महेंद्रने काही वर्षांनी इम्तियाज खानशी लग्न केले. आजही ती राजेश खन्नाची मैत्रीण म्हणून चर्चेत असते.

चित्रपटसृष्टीतील लग्नाची गोष्टी सहजी न संपणारी. अक्षयकुमार आणि रविना टंडन यांच्या प्रेमप्रकरणात विघ्न आले आणि अचानक अक्षयकुमारने ट्विंकल खन्नाशी लग्न केले. तिची आणि जितेंद्रचा भाचा अभिषेक कपूर यांची दोस्ती गाजत होती. एका लग्नामागे किती आणि कशा कशा गोष्टी असतात बघा. अजय देवगण आणि रविना टंडन यांच्याही मैत्रीचे किस्से गाजले. आणि त्यातूनच तिला 'दिव्यशक्ती' या चित्रपटात संधी मिळाली.

माधुरी दीक्षितच्या लग्नाची गोष्ट खूपच वेगळी. एका सुपर स्टारचे हे लग्न आहे. मला आठवतंय, मुंबईतील आम्हा काही सिनेपत्रकाराना आरजू या चित्रपटाच्या शूटींग रिपोर्टिंगसाठी पनवेल येथील सुर्वे फार्मवर नेले असता आम्हा सिनेपत्रकारांशी होत असलेल्या औपचारिक गप्पांत तिच्या लग्नाचा निघालेला विषय तिने चलाखीने टाळला. त्या दिवसांत 'तू लग्न कधी करणार?' या प्रश्नाने तिला गॉसिप्स मॅगझिनने भंडावून सोडले होते आणि ती काही केल्या उत्तर देत नव्हती. अगदी १९९९ साली आपल्या वाढदिवसानिमित्त तिने मुंबईतील आम्हा काही निवडक सिनेपत्रकारांना जुहू येथील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये चायनीज फूडची छान पार्टीदेखील दिली. तेथेही आपल्या लग्नाचा विषय तिने शिताफीने टाळला.

अशातच ५ नोव्हेंबर १९९९ रोजी रात्री दहा वाजताच्या आपल्या वार्तापत्रात 'आज तक'ने खास खबर देत म्हटले, माधुरी दीक्षितने अमेरिकेत डॉ. श्रीराम नेने यांच्याशी लग्न केले. ही ब्रेकिंग न्यूज म्हणजे जोर का धक्का धीरेसे लगे असा मामला होता. सोशल मीडियाच्या आगमनापूर्वीचे ते दिवस होते. श्रीराम नेने दिसतात कसे हा यातील सर्वात मोठा प्रश्न होता. प्रचंड कुतूहल वाढत वाढत गेले. बरेच दिवस उत्तर मिळत नव्हते. हे लग्न १७ ऑक्टोबर रोजी झाले हे समजले. अखेर मुंबईतील अंधेरी येथील द क्लब येथे या लग्नाचा अतिशय ग्लॅमरस असा स्वागत सोहळा रंगला. आज तक वृत्त वाहिनीवर काही मिनिटांचे लाईव्ह वृत्त दाखवले. मराठी वृत्तपत्राच्या पहिल्या पानावरची ही नवदाम्पत्याच्या आकर्षक फोटोसहची बातमी झाली.

कशी वळणे घेत घेत या लग्नाची गोष्ट रंगतदार ठरली यावर एक एपिसोड होईल. असेच आणखी एक रंगतदार लग्न... अमिताभ बच्चनच्या साठाव्या वाढदिवसाच्या निमित्ताने जुहू येथील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका इव्हेंटसमध्ये ऋषि कपूरने जाहीर केले की, अभिषेक बच्चन कपूर खानदानाचा जावई बनणार. लगोलग बातमी झाली, अभिषेक बच्चन आणि करिश्मा कपूर लवकरच विवाहबंधनात अडकणार... काही दिवस होताहेत तोच कुजबुज सुरू झाली अभिषेक बच्चन आणि करिश्मा यांच्यात कशावरुन तरी बिनसलं. काही दिवसांनी चर्चा रंगली, जया बच्चन यांची इच्छा आहे, रानी मुखर्जी आपली सून व्हावी. अमिताभला वाटत होते, ती जागा ऐश्वर्या रॉयला मिळावी. उचे लोग उंची पसंत असा हा मामला. अखेर जुहू येथील दहाव्या रस्त्यावरील प्रतीक्षा बंगल्यावर अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय यांचा विवाह सोहळा पार पडला. तीन दिवस हे लग्न चाललं.

विजय देवरकोडा आणि रश्मिका मन्दाना यांच्या विवाहानिमित्त हा एक फ्लॅशबॅक. फिल्मवाल्यांची लग्न हा बहुरंगी बहुढंगी असा विषय. त्यातील काहींच्या संसाराचा रंग फिकट पडला, तर काहींच्या संसाराचा रंग पार उडाला... सेलिब्रिटीजची लग्ने हा अनेक वळणे घेत घेत रंगणारा विषय नक्कीच आहे. एकासारखे दुसरं लग्न नाही.

श्रीदेवीने विवाहित बोनी कपूरशी लग्न करण्यामागे एक भावनिक कारण होतं, बोनी कपूर निर्मित आणि राज कंवर दिग्दर्शित 'जुदाई' या चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या काळात श्रीदेवीची आई आजारी होती आणि मग अमेरिकेत तिच्यावर उपचार सुरू असताना बोनी कपूर श्रीदेवीचा अतिशय मोठा आधार होता. त्यातूनच ते नाते जुळले आणि मग त्याचे रूपांतर प्रेमात व मग लग्नात झाले. सगळीच लग्ने फिल्मी नसतात. काही संवेदनशीलही असतात...

# शूर योद्धा राय लखिशा बंजारा

हिंद-दी-चादर श्री गुरू तेग बहादुर साहीबजी यांच्या ३५०व्या शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. गुरु तेग बहादुर यांच्याशी संबंधित अनेक घटनांचा, ऐतिहासिक पैलूंवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न होत आहे. या लेखाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादुर यांच्याशी संबंधित शूर योद्धा राय लखिशा बंजारा यांचा आपण परिचय करून घेणार आहोत...

राय लखिशा बंजारा हे मध्ययुगीन भारतातील शूर, दानशूर आणि लोककल्याणासाठी समर्पित असे महान योद्धे होते. त्यांच्या जन्मापासून ते कार्यापर्यंतचा प्रवास हा पराक्रम, त्याग आणि मानवतेचा आदर्श ठरतो. आपले राष्ट्रपती भवन पूर्वाश्रमीचे लखिशा बंजारा यांची ही भूमी आहे. पंजाबमधील खैरपूर (ता. अलीपूर, जि. मुजफ्फरगड) येथे ४ जुलै १५८० रोजी त्यांचा जन्म झाला. सध्या हे ठिकाण पाकिस्तानमध्ये आहे.

वडील गोधु बंजारा वडतिया जाधव व्यवसायाने सिव्हील ठेकेदार होते.आजोबा ठाकूरदास बंजारा वडतिया जाधव योद्धा व कुशल व्यापारी होते. नागैया, हेमा, हरी, सितु, पांडरा, बक्षी, बाला, जवाहर ही मुले, तर सितो नावाची मुलगी लखिशा बंजारा यांना होती. १७ नातू व २४ पणतू असा मोठा परिवार होता. १६०८मध्ये गोराम पवार परिवारातील कांतोबाईसोबत विवाह झाला.

लखिशा बंजारा यांना ९९ वर्षे १० महिने एवढे आयुष्य लाभले. नवी दिल्ली येथे रायसिना, मालचा, बाराखांब आणि नरेला ही गावे त्यांनी वसविली आहेत व ८० तांड्याची मालकी होती. राजधानी दिल्लीच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली चार गावांची जमीन लखिशा बंजारा यांच्या नावाने महसूल रेकॉर्डवर होती.

मथुरा वृंदावन जयसिंगपूर येथे आजही लखिशा बंजारा यांची सात एकर महसुली जमीन असून उदासीन आश्रमाच्या ताब्यात आहे. तेथे लेंगी व बंजारा होळी साजरी केली जाते. बुंदेलखंडमधील सागर परिसरात राय लखिशा बंजारा यांना लोकनायक म्हणून आदरार्थी ओळखले जाते. सागर तलाव लखिशा बंजारा यांच्या नावाने आजही ओळखला जातो. या तलावाजवळ लखिशा बंजारा यांचा



पुतळा असून परिसरात ऐतिहासिक स्थळे व मंदिरे आहेत.

दानशूर लखिशा बंजारांनी लोककल्याणासाठी शेकडो तलाव बांधले, विहिरी खोदल्या, व्यापारी मार्गावर १० किलोमीटर अंतरावर तांडा, मुक्कामासाठी धर्मशाळा बांधल्या. लखिशा यांनी निर्माण केलेल्या विहिरी आजही बंजारा बावडी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्या दगडावर राय लखिशा बंजारा यांचे नाव कोरले असल्याचे आजही पहावयास मिळते.

फारसी भाषेतील शहा व भारतीय भाषेतील राय या दोन्ही शब्दांचा अर्थ राजा असा होतो. बाबा बंदासिंह बहादूर यांनी लोहगड किल्ल्याची निर्मिती केली. किल्ला निर्माण कार्यात लखिशा बंजारा यांचे खूप मोठे योगदान राहिले होते. बांधकामासाठी लागणारे कारागीर, मजूर, दगड, चुना इत्यादी साहित्य त्यांनी पुरविले. हरियाणामधील यमुनानगर जिल्हा आणि हिमाचल प्रदेशातील सिरमोर जिल्ह्यात लोहगड किल्ला सात हजार एकर भूक्षेत्रात विस्तारला आहे. लोहगड किल्ला, लाल किल्ला, बंजारा विश्रामस्थल आणि गुरुद्वारा रकबगंज ही त्यांची ऐतिहासिक संस्मरणीय कृती याची साक्ष देत आहे. दिल्लीचा लाल किल्ला लखिशा बंजारा यांच्या २५५ एकर क्षेत्रात निर्माण केला गेला आहे. किल्ल्याला दक्षिण दिशेला लाहोर मुख्यद्वार, दुसरा मुख्यद्वार दिल्ली गेट आणि यमुना नदीकडे असलेला वॉटर गेट अशी रचना केलेली आहे.

लखिशा बंजारा हे शूरवीर व दानशूर योद्धा होते. धर्म स्वातंत्र्य आणि मानवतेसाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणारे शिखांचे नववे गुरू तेग बहादुर यांचे मृत शरीर मिळविण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावून त्यांचा अंतिम संस्कार रायसिना रकाबगंज दिल्ली येथे केला व रक्षा एका घटात भरुन जमिनीत पुरली. गुरू तेग बहादुरसिंह यांचे शिर भाई जेता बंजारा यांनी १६ नोव्हेंबर १६७५ रोजी त्यांचे पुत्र गोविंद राय यांना सुपूर्द केले व १७ नोव्हेंबर रोजी आनंदपूर साहिब येथे अंत्यसंस्कार करण्यात आला. जगातील ही एकमेव घटना आहे की, शरीर व शिर यांचा अंत्यसंस्कार दोन वेगवेगळ्या ठिकाणी करण्यात आला.

१५ जानेवारी १७८३ रोजी लखिशा बंजारा वडतिया यांच्या घराची एक भिंत बांधकामासाठी पाया खोदणे सुरू होते तेव्हा जमिनीत पुरून ठेवलेला घट निघाला. हे स्थळ आजच्या संसद भवन समोरच आहे. आता तेथे लखिशा बंजारा यांचे स्मरणार्थ भाई लखिशा बंजारा हॉल बांधण्यात आला आहे. रायसिना टेकडीच्या बाजूला मालचा तांड्यात लखिशा बंजारा यांनी २८ मे १६८० रोजी दिल्ली मालचा पॅलेसमध्ये अखेरचा श्वास घेतला. लखिशा बंजारा हे महान सेनानी आपले प्रेरणास्थान म्हणून सदैव संस्मरणीय राहील.

**-अवि चव्हाण,** नांदेड

# ऐतिहासिक कादंबरीकार वि.स.वाळिंबे

विनायक सदाशिव वाळिंबे अर्थात वि.स. वाळिंबे किंवा बाबा वाळिंबे हे मराठी लेखक व पत्रकार होते. त्यांनी विशेषकरून ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या तसेच केसरी वृत्तपत्राचे ते पत्रकार होते.



विनायक सदाशिव वाळिंबे यांचा जन्म ११ ऑगस्ट १९२८ रोजी झाला. विद्यार्थीदशेत वाळिंबे पुण्यात वास्तव्यास होते. इ.स. १९४८ साली गांधीहत्येनंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर घालण्यात आलेल्या बंदीच्या विरोधातल्या सत्याग्रहात वाळिंब्यांनी सहभाग घेतला. त्यासाठी त्यांना तीन महिने येरवडा कारागृहात बंदी ठेवण्यात आले होते. इतिहास आणि तो घडवण्यात अग्रेसर असणारी मोठी माणसे यांचे जबरदस्त आकर्षण वि.स.वाळिंबे यांना होते आणि तीच त्यांच्या लेखनाची प्रेरणा होती.

वाचनीयता आणि रसवत्ता जराही उणावू न देता अभ्यास आणि कष्ट यांनी निवडून, पारखून दिलेला तपशील उत्तम रीतीने मांडण्याचे कौशल्य वाळिंबे यांच्या जवळ होते. त्यांच्या लेखणीला ती एक सिद्धीच होती. प्रसंगातले नाट्य अचूक टिपण्याच्या त्यांच्या मार्मिकतेमुळे वाचकाला अपूर्व समाधान मिळते. त्यांचा हिटलर किंवा त्यांचे सावरकर किंवा त्यांचे नेताजी वाचताना त्यातले प्रसंगनाट्य अक्षरश: खिळवून ठेवते, पण त्यांच्या लेखणीचे बळ केवळ तेवढेच नाही. घटना-प्रसंगांचे अंत:प्रवाह शोधणाऱ्या त्यांच्या बारकाव्यात ते आहे. मोठ्या पार्श्वपटावर लहान घटना पाहण्याच्या जाणकारीत आहे, संदर्भांची विविधता आणि त्यातून घटना-प्रसंगांना मिळत जाणारी दिशा याकडे लक्ष पुरवण्याच्या त्यांच्या दक्षतेत आहे. व्यक्तीच्या मर्मस्थानांविषयी अतिशय कुतूहल बाळगणाऱ्या त्यांच्या प्रगल्भ जीवनदृष्टीत आहे. त्यांनी मोठ्या माणसांच्या मोठेपणाची अनेक अंगांनी उकल करण्याचा प्रयत्न केला. मानवी मर्यादांचे, दौर्बल्याचे, मोहप्रवणतेचे भान ठेवून त्यांनी जागतिक पातळीवरची महत्वाची व्यक्तिमत्त्वे लेखनविषय केली.

चांगल्या जाणत्या, तयारीच्या बहुश्रुत अशा वाचकाचेही समाधान करणारी गुणवत्ता त्यांच्या लेखनातून प्रकट झाली आणि ती शेवटपर्यंत अखंड टिकूनही राहिली. वि.स.वाळिंबे यांचे २२ फेब्रुवारी २००० रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**


# महान व्हायोलिन वादक पं. व्ही.जी. जोग

दिवंगत पं. विष्णू गोविंद जोग उर्फ व्ही.जी. जागे यांना कोणत्याही परिचयाची गरज नाही. हे वादक अनेक अंगांचे होते. ते एकल वाद्याच्या रूपात हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतात पाश्चात्य व्हायोलिनची ओळख करून देण्याचे प्रणेते आहेत. प्रख्यात तबलावादक पं. समर साहा यांनी त्यांच्या मुलाखतीत योग्यच म्हटले आहे की, पं. व्ही.जी.जोग आणि व्हायोलिन हे वाद्य एकमेकांना पूरक आहेत.

पं. जोग यांचा जन्म २२ फेब्रुवारी १९२२ रोजी महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील वाई गावात झाला. अगदी लहान वयातच त्यांनी त्यांचे वडील गमावले, त्यांचे भाऊ शंकरराव आठवले यांनी त्यांना प्रेरणा दिली आणि त्यांची काळजी घेतली. सुरुवातीला त्यांनी एस.सी. आठवले, गणपत राव आणि मिराशी बुवा यांच्याकडून संगीताचे प्रशिक्षण घेतले. त्यांनी विज्ञानेश्वर शास्त्री यांच्याकडून व्हायोलिनचे शिक्षण घेतले आणि एस.एन. रतन झांकर यांच्याकडूनही धडे घेतले. नंतर ते बाबा अल्लाउद्दीन खान यांचे शिष्य झाले. त्यांची लखनऊ येथील मॉरिस कॉलेजमध्ये व्हायोलिनचे संगीत प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली. त्यांनी कोलकाता येथील संगीत संशोधन अकादमी (एसआरए)मध्ये बराच काळ काम केले.

पं. जोग यांनी अनेक गुरूंकडून शिक्षण घेतले असले तरी ते व्हायोलिन वादनाच्या एका अनोख्या शैलीने स्वतःला स्थापित करू शकले. त्यांच्या व्हायोलिनच्या अनोख्या शैलीला अनेक पैलू आहेत. त्यांची वादन शैली गायकी आणि गटकरी यांचे मिश्रण आहे. मिंड, गमक, सपत, धनुष्यबाण इत्यादींचा वापर ही त्यांची अनोखी शैली आहे आणि त्यांच्या विशिष्ट शैलीने त्यांना अमर पं. व्ही.जी.जोग बनवले.

पं. जोग यांनी सतार आणि सरोद वादनाच्या शैलीला अनुसरून दारा-दीरी, दीरी-दारा, दिरदा इत्यादी बोल वादनाची ओळख त्यांच्या व्हायोलिनमध्ये करून दिली. काही हलक्याफुलक्या रचना आणि लोकगीते वाजवून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करण्याची त्यांची क्षमता होती. त्यांचे एक मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ते प्रेक्षकांची आवड जाणून घेऊ शकत होते आणि त्यानुसार ते त्यांच्या रचना निवडत असत.



पं. जोग १९३८मध्ये लखनऊ येथील एका संगीत महोत्सवात उ. अल्लाउद्दीन खान यांच्या संपर्कात आले आणि खान साहेब जोग यांच्या वचनाने इतके प्रभावित झाले की उ. अल्लाउद्दीन खान यांनी १९४१मध्ये अल्मोडा येथील उदय शंकर कल्चर सेंटरमध्ये या तरुण प्रतिभावान कलाकारासोबत युगलगीत वाजवण्यास सहमती दर्शवली. त्यांनी फैयाज खान, पं. ओमकारनाथ ठाकूर, बडे गुलाम अली खान, अमीर खान, केसर भाई, बेगम अख्तर यांसारख्या महान समकालीन कलाकारांसोबत काम केले आहे. किराणा घराण्याच्या हिराबाई बडोदेकर यांच्यासोबत सहा महिने दक्षिण आफ्रिकेला भेट दिली. ग्वाल्हेर, आग्रा, किराणा या अनेक घराण्यांमधून त्यांनी स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण शैली विकसित केली जी कलाकारांनी खूप कौतुकास्पद मानली.

पं. जोग यांनी अनेकदा हलक्याफुलक्या विषयांवर आणि लोकसंगीताने प्रेक्षकांना प्रबोधन केले. सनई वादक उ. बिस्मिल्ला खान यांच्यासोबतच्या त्यांच्या युगलगीताला भारतात आणि परदेशात शानदार व्यावसायिक यश मिळाले. पं. जोग असे कलाकार होते ज्यांच्याकडे सलग तीन पिढ्या शास्त्रीय संगीतकारांच्या पदानुक्रमात सर्वोच्च स्थानावर विराजमान होण्याचे वेगळेपण होते. त्यांचे स्वरूप नेहमीच हास्याने भरलेले आणि अतिशय आकर्षक व्यक्तिमत्व होते.

पंडित जोग यांची ऑल इंडिया रेडिओ, लखनऊ येथे संगीत निर्माता म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर ते मुंबई, दिल्ली आणि कोलकाता स्टेशनवर गेले. ते ऑल इंडिया रेडिओवरून उपमुख्य निर्माता म्हणून निवृत्त झाले. १९७३मध्ये त्यांना इंडियन म्युझिक सर्कल, वसर, यूएसए कडून व्हायोलिन सम्राट , १९७८ मध्ये हरिदास संगीत संमेलन, बॉम्बे कडून तंत्री विलास आणि १९८०मध्ये ललित कला पिठ, भुवनेश्वर, ओरिसा कडून बेहला सम्राट हे पुरस्कार मिळाले. १९८१मध्ये त्यांना भारतीय संगीतातील त्यांच्या सेवेसाठी संगीत नाटक अकादमी पुरस्कार मिळाला आणि १९८३मध्ये भारताच्या राष्ट्रपतींनी त्यांना पद्मभूषण ही पदवी प्रदान केली.

पं. जोग यांना भूतकाळातील आणि वर्तमानकाळातील सर्वात महान व्हायोलिन वादक असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. ३१ जानेवारी २००४ रोजी पार्किन्सन आजार आणि श्वसनाच्या समस्येमुळे कोलकाता येथे त्यांचे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

# पळसदरी-कर्जत मार्ग धोकादायक

## शेतकऱ्यांना मोबदला न दिल्याने रखडले रस्त्याचे काम

**खोपोली : प्रतिनिधी**

दोन तालुक्यांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग असून खालापूर पळसदरी मार्गे कर्जत रस्त्याचे रखडलेले कामामुळे महिन्याला एक जीवघेणा अपघात होत असल्याने प्रशासन, लोकप्रतिनिधी यांनी मनावर घेतल्यास काम मार्गी लागून अपघात टळणार आहेत.

कर्जत खालापूर तालुक्याला जोडणारा अतिशय महत्त्वाचा रस्ता गेल्या सात वर्षापासून रखडला आहे. राष्ट्रीय महामार्ग ५४८ शाहापुर, मुरबाड, कर्जत, पळसदरी, खोपोली, वाकण असा जात आहे. रस्त्याचे जवळपास काम पूर्ण झाले असून कर्जत हद्दीत वारणे, अंजरूण, खालापूर हद्दीत नावंढे, हाळ भागात शेतकऱ्यांना एक रुपया मोबदला न दिल्याने काम अडवले आहे. अपूर्ण काम असलेल्या ठिकाणी रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे.

अपूर्ण काम असलेल्या ठिकाणी रस्ता तयार करण्यात आला नसून पूर्वीचा डांबरी रस्तादेखील शिल्लक राहिलेला नाही. या ठिकाणी प्रचंड मोठ्या आकाराचे खड्डे पडले असून या खड्ड्याचा अंदाज न आल्याने वारंवार अपघात घडत आहेत. काही ठिकाणी अचानक दोन मार्गिकेचा रस्ता एका मार्गिकेचा होत असून वाहन चालक गोंधळून अपघात घडतात. रात्रीच्या वेळेस तर वाहन चालकांना रस्त्याचा अंदाज येत नसून अनेक जीवघेणे अपघात घडले आहेत. सध्या नावंडे गावाचे हद्दीत विकास प्रकल्प सुरू असून महामार्गालगत मोठ्या प्रमाणात बाजूपट्टीवर माती जमा झाली असून ठिकाणी सतत जेसीबीने काम सुरू असल्याने वाहतुकीला देखील अडथळा निर्माण होत आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी संदीप पाटील यांनी गेल्या वर्षी रस्त्याची पाहणी केली होती, परंतु आवश्यक ती उपाययोजना होत नसल्याने पाहणी केवळ फार्स ठरत आहे, असे शेतकरी किरण हाडप यांनी सांगितले.




**आमची वडिलोपार्जित जागा रस्त्यात गेली आहे, परंतु आम्हा शेतक-याना एक रुपया मोबदला मिळालेला नाही. केवळ कागदी नोटीस पाठवल्या जात आहेत. गुरुवारी मी स्वतः या मार्गावर अपघात झालेल्या व्यक्तीला रुग्णालया त उपचार करता दाखल केले.**

**–किरण हाडप, शेतकरी, नावंडे**

**शेतकऱ्यांना मोबदला देण्याचा विषय अद्याप प्रलंबित आहे. यासाठी मंत्रालयात बैठका झाल्या आहेत. शेतकऱ्यांना मोबदला एमएमआरडीनी द्यायचा की सार्वजनिक बांधकाम विभागाने द्यायचा यावर निश्चिती झालेली नाही.**

**–उमेश माने, निवासी अभियंता, एमएमआरडीए**

# उद्योजक गणेश जाधव यांचा शिवसेनेत प्रवेश

**माणगाव : प्रतिनिधी**

राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या विकासकामांनी प्रेरित होऊन उद्योजक गणेश जाधव यांनी नुकतेच माणगाव येथे आपल्या प्रमुख कार्यकर्त्यांसमवेत मंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केल्याची माहिती पक्षाचे कार्यकर्ते तथा माजी उपसरपंच नितीन दसवते यांनी दिली.

उद्योजक गणेश जाधव यांनी अनेकांना रोजी रोटीला लावले आहे. त्यामुळे माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्यात त्यांचे विशेष असे नाव आहे. त्यांच्या सारख्या उदयोन्मुख कार्यकर्त्याला हेरून शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी त्यांना मंत्री भरत गोगावले यांच्या विकास कामांची व त्यांच्या काम करण्याची पद्धत याची माहिती दिली. याला आकर्षित होऊन उद्योजक गणेश जाधव यांनी मंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

मंत्री भरत गोगावले यांनी प्रवेशकर्ते गणेश जाधव व सहकाऱ्यांचे शिवसेना पक्षात स्वागत करून प्रवेशकर्ते आपण सर्वांना पक्षात मानाचे स्थान दिले जाऊन आपण सर्वांनी पक्ष संघटना वाढविण्याच्या दृष्टीने काम कराल अशी इच्छा यावेळी व्यक्त केली. या पक्ष प्रवेश कार्यक्रमास जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, माणगाव नगरीचे माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी उपसरपंच नितीन दसवते, प्रसाद धारिया व सहकारी उपस्थित होते.



# थंडी घटली! उकाड्यात वाढ

**अलिबाग : प्रतिनिधी**

दिवसेंदिवस थंडी घटली असून फेब्रुवारी महिला सुरू झाल्यापासून तापमानाचा पारा वर सरकत असून त्यामुळे उकाड्यात वाढ झाली आहे. त्यामुळे दिवसा घामाच्या धारा लागत आहेत.

बाजारपेठेतही दुपारच्या वेळेत वरदळ कमी पहावयास मिळते. अचानक वाढलेल्या तापमानामुळे आजारही वाढले आहेत. त्यामुळे काळजी घेण्याचे आवाहन डॉक्टरांनी केले आहे.


## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने सुचीत करण्यात येते की **सुमंगला पंडीत राठोड** यांचे मालकी हक्काची व ताबेकब्जामधील मौजे.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत माझे अशिल यांनी कायम खुष खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चिरनेर,ता.उरण, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| चिरनेर | १७६ | ६ | ०- ८३-८० | ७.१२ |

सदरच्या मिळकती या वरील मालकांच्या मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहीवाटीतील असून त्या विकण्याचा त्यांना हक्क व अधीकार असल्याने त्यांनी सदरच्या जमीनीतील लहान मोठी झाडे तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमच्या अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे.तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार .ताबा क़ब्जा क़ुळवहिवाट ग़हाण द्रान ब़क्षिसपत्रे फ़रोक्त चार्ज लिज अ़ॅटॅचमेंट ल़ीन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अ़ॅड.जितेंद्र पोशा भोईर यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावे.मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील.मागावून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अ़ॅड.जितेंद्र पोशा भोईर**
मु.कळंबुसरे, पो.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड.
मो.नं. ९८२१५३६६१६.


# शिवजयंती निमित्ताने एमडीएन इंटरनॅशनल स्कूलची मिरवणूक

**रोहा : प्रतिनिधी**

संदीप तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली एम डी एन इंटरनॅशनल स्कूल वरसगाव कोलाडच्या वतीने इंदापूर व माणगाव येथे मिरवणूक झाली.

इंदापूर, तळा रोड येथून मिरवणूकीला सुरूवात करण्यात आली ती सह्याद्री बॅंक, इंदापूर बस स्थानक व त्यानंतर माणगाव बस स्थानकापासून मिरवणूकीला सुरूवात करण्यात आली ते निजामपूर रोड व कचेरी रोड येथे नेण्यात आली विद्यार्थीनी जागोजागी पथनाट्य सादर केली.

सुंदर पाळणा गीत, पोवाडे व अबझल खानाचा वध हे सर्व सादर करण्यात आले. या कार्यक्रमाची सांगता हि माणगाव मराठा समाज हॉल येथे करण्यात आली हा सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डायरेक्टर देवेंद्र चांदगावकर प्रिंसिपल योगिनी देशमुख,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.



# शिवजयंतीनिमित्त मुरूडमध्ये स्पर्धा



**मुरुड : प्रतिनिधी**

सालाबादाप्रमाणे मुरूड-जंजिरा नगर परिषद व शिवजयंती उत्सव समिती तर्फे या वर्षीदेखील मोठ्या उत्साहात शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. यंदा ही वक्तृत्व स्पर्धेतील प्रत्येक गटातील विजेत्या स्पर्धकांनी शिवरायांचा जीवनपट आपल्या प्रभावी वक्तत्वाने उपस्थितांसमोर उलगडून उत्स्फूर्त दाद मिळवली.

या वेळी व्यासपीठावर नगराध्यक्षा आराधना दांडेकर, उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, गटनेते पांडुरंग आरेकर, नगरसेवक आदेश दांडेकर, रूपेश रणदिवे, नितीन अंबुर्ले, विजय पाटील, तमीम ढाकम, नगमा खानजादे, यास्मीन कादिरी, देवयानी गुरव, प्रांजली मकू, माजी नगरसेवक प्रमोद भायदे, अशिल कुमार ठाकूर, प्रशासन अधिकारी नंदकुमार आंबेतकर, आशिष दिवेकर आदी उपस्थित होते.

यावेळी वक्तृत्व स्पर्धेचा अंतीम निकाल घोषित करण्यात आला व यशस्वी स्पर्धकांना मुरुड नगरपरिषद व पदमदुर्ग जागर संस्थेतर्फे प्रशस्तीपत्र व रोख बक्षिसे देण्यात आली.

# खालापूर पोलीस ठाण्यात शिवजयंती

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस ठाण्यात आज शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करून मानाचा मुजरा करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती हा महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध सण व उत्सव आहे. हा सण स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मदिवसानिमित्त जगभर मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. आज खालापूर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी शिव प्रतिमे चे पूजन करून पुष्पहार अर्पण करून, मानाचा मुजरा केला.

यावेळी पोलीस उप निरीक्षक शिवाजी जुंदरे, खालापूर पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंत पाटील ठोंबरे, कार्यालयातील पोलीस अधिकारी, कर्मचारी हेही उपस्थित होते.




अर्जदारातर्फे वकील अ़ॅड. उज्वला तेटगुरे

**मे. दिवाणी न्यायाधिश व स्तर पनवेल यांचे कोर्टात**

चौकशी अर्ज क्र. ६२/२०२६
ने.ता. २७/३/२०२६
नि.८/ड

१. श्रीमती विशाखा विजय तवटे
२. श्री. दर्शन विजय लवटे
३. श्री. आर्यन विजय तवटे .......अर्जदार

## जाहिर नोटीस

सर्व तमाम लोकांस कळविण्यांत येते की, ज्याअर्थी, कै. विजय शांताराम तवटे हे दिनांक ०८/११/२०२५ रोजी विस्टा आर्कड रूम नं ३०४ प्लॉट नं ३१/३२ खांदेश्वर रेल्वे स्टेशन जवळ सेक्टर २२ कामोठे पनवेल-जि-रायगड येथे निधन झाले आहे. कै. विजय शांताराम लवटे यांचे मालकी हक्कात आणि ताबे कब्जात पूढील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**१. प्रभाव क्षेत्र २७.१ दर ५२६०० सदनिका क ५०२ पाचवा मजला श्रीपती सॉलिटेअर प्लॉट नं १७० सेक्टर नं ३ करजांडे पनवेल जि रायगड चटई क्षेत्र २६.६९१ चौ.मी युजेबल एनक्लोज्ड बाल्कनी क्षेत्र ३.७६४ चौ.मी नॉन एक्सेसेबल छज्ञा क्षेत्र ४. ४७० चौ. मी व सर्व्हिस बक्षेत्र ०.७८८ चौ. मी क्षेत्रफळ २६.६९१ चौ. मीटर**

**२. उपविभागाचे नाव १५अ/२२ सदनिका क ३०४ तिसरा मजला विस्टा आर्केड प्लॉट नं ३१/३२ सेक्टर २२कामोठे पनवेल-जि रायगड +७ क्षेत्रफळ ७३.२५५ चौ. मी. बांधीव + टेरेस ९.८४७ चौ.मी.**

मयत **कै.विजय शांताराम तवटे** यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तिगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन वर नमुद मे. व्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यांत येते की, वर नमुद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे, न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै. विजय शांताराम तवटे यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दिनांक २०/०२/२०२६ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**लिपिक**
**दिवाणी न्यायालय (व स्तर)**
**पनवेल, जिल्हा रायगड**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय (व स्तर)**
**पनवेल, जिल्हा रायगड**


# संतोष महाराज सते यांचा सत्कार



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नजीक लव्हेज या गावात छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त दोन दिवशीय अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी समारोपप्रसंगी काल्याचे किर्तन पनवेलचे कीर्तनकार हभप संतोष महाराज सते यांचे सुश्राव्य कीर्तन झाले.

या वेळी ग्रामस्थांनि त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला, दोन दिवसीय कार्यक्रमात विविध अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हभप ज्ञानेश्वरीताई घारे यांचे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर कीर्तन आयोजित करण्यात आले होते, सकाळपासून काकड आरती, प्रवचन, द्वीप प्रजनन व अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बाल शाहीर शौर्य निंबाळकर यांनी पोवाडा सादर करून उपस्थिततांची मने जिंकली.

गुरुकृपा भजनी मंडळाचे सर्व सदस्य त्याप्रमाणे ग्रामस्थ यांनी कार्यक्रम आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. सामाजिक कार्यकर्ते किशोर पाटील यांच्या हस्ते हभप संतोष महाराज यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी नेरे वांगणी येथील प्रवचनकार हभप ज्ञानेश्वर महाराज शिंदे, प्रकाश बुवा पाटील, गणेश पाटील, सोपान पाटील मधुकर पाटील आदी उपस्थित होते.

# माणगाव तर्फे वरेडीमध्ये शिवशिल्पाचे लोकार्पण

**कर्जत : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिल्प माणगाव तर्फे वरेडी मध्ये उभारण्यात आले आहे. या शिव शिल्पाचे लोकार्पण शिवजयंतीचे निमित्ताने आयोजित कार्यक्रमात करण्यात आले.



कर्जत तालुक्यातील माणगांव तर्फे वरेडी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंती उत्सव शिवजयंती केवळ उत्सव न ठरता एक 'ऐतिहासिक उत्सव ठरला. गावातील श्री शिवराज प्रतिष्ठान आणि स्थानिक ग्रामस्थ यांचा मेहनतीतून गावातील मानाई देवीच्या विस्तीर्ण प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाची प्रतिकृती असलेले शिल्प उभारण्यात आली. या स्मारकाचे वैशिष्ट्य म्हणजे हे कोणत्याही दगड किंवा सिमेंटचे नसून, संपूर्णतः लोखंडाच्या कलाकुसरीतून साकारलेले परिसरातील एक दुर्मीळ स्मारक ठरले आहे. येथील वेल्डर असलेले कारागीर गणेश हिलाल, जयेंद्र कांबरी आणि योगेश कराळे यांनी आपल्या वेल्डिंग आणि कोरीव कामातून हे शिल्प साकारले आहे.

या स्मारकाच्या सौंदर्यात भर टाकण्यासाठी विजय धुळे यांनी मार्बलचे काम, तर योगेश आगीवले यांनी आकर्षक रंगसंगती केली आहे. रात्रीच्या वेळी हे स्मारक करण खारके यांच्या विद्युत रोषणाईने उजळून निघावे यासाठी करण खारके यांनी आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. तर विशाल भोईर यांनी साकारलेला कारंजा या परिसराला चैतन्य प्रदान करतो.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. संजय खदेरूराम गुप्ता रा. वावेघर, ता. पनवेल, पो. रसायनी, जिरायगड यांनी दिलेल्या माहितीवरून व दाखिवलेल्या कागदपत्रावरून सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे आशिल वरील पत्यावर कायमचे रहिवासी असुन दिनांक. १९/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता रिस ते मोहोपाडा असे प्रवास करीत असताना त्यांच्याकडील खालील नमुद मुळ दस्तऐवज रस्त्यात कुठेतरी पडुन गहाळ झाले आहेत त्याबाबत त्यांनी पोलीस स्टेशन रसायनी येथे लेखी अर्ज दिलेला असुन त्याचा प्रापर्टी मिसींग रजिस्टर नंबर.००७२/२०२६ दिनांक. २०/०२/२०२६ रोजीचा दाखला पोलीस स्टेशन रसायनी यांनी दिलेला आहे.

१. मिसींग प्रापर्टीचे वर्णन – मौज रिस ता. खालापूर, जि. रायगड येथील सर्व्हे नंबर ३८/१, प्लॉट क. ११ या वरती बांधण्यात आलेल्या सुनित आनंद को. ऑप. हौ. सो या इमारत मधील दुसऱ्या मजल्यावरील, सदनिका क. १३, क्षेत्रफळ ६८२.०० चौ फुट, ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा यांचेकडील असिसमेंट रेकॉर्डप्रमाणे घर अगर मालमत्ता क.१६०/२०१३ असे वर्णनाचे मिळकतीचा करारनामा दिनांक २३/०१/१९९१ रोजी बिल्डर लिहुन देणार श्री. सुनिल गुप्ते, श्री. विनीत चिरमाडे व लिहुन घेणार जी.एस. कटगिरी यांचे मध्ये दुय्यम निंबधक कर्जत यांचे कार्यालयात नोंदणीकृत झालेला करारनाम्याची मुळ प्रत.

सदरचा मिसींग दस्त कोणत्याही व्यक्तीस सापडल्यास त्यांनी पोलीस स्टेशन रसायनी अथवा आमचे आशिल श्री. संजय खदेरूराम गुप्ता अथवा जाहीर नोटीस प्रसिद्ध करणारे ॲडव्होकेट यांच्याशी संपर्क साधावा. हे सर्व लोकांस कळावे.

**दिनांक: २०/०२/२०२६**
**ठिकाण: रिस**

**Sd/-**
**Adv. SACHIN R. CH-LKE**

Mah/4413/2012 (BALLB) Office: Gokul Nagari Bulding, 1st Floor, Room No. 107, Vilage Rees, Tal Khalapur, Dist. Raigad, Maharashtra, Pin-410 222.
Mobile: 8600990469/8180823040
Email- advsrchalke1979@gmail.com


# मुस्लिम बांधवांचे पवित्र रमजान रोजे सुरू

**माणगाव : प्रतिनिधी**

इस्लामी शाबान महिन्यानंतर रमजान महिना सुरू होतो. बुधवार १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी चंद्र दर्शन झाल्यावर पवित्र रमजान महिना सुरू होऊन मुस्लिम बांधवांचे गुरुवार दि,१९ फेब्रुवारीपासून पवित्र रमजानचे रोजे सुरु झाले आहेत.

इस्लाम धर्मात नमाज, रोजा, जकात, हाज, इमान हि पाच मूलभूत तत्वे मानली जातात. त्यापैकी रोजा हा एक असून पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम बांधव अल्लाहाच्या नावावर पवित्र रमजानचे रोजे महिनाभर धरीत असतात. पहाटे ३ वाजता उठून मुस्लिम भगिनी स्वयंपाक करतात. त्यानंतर पहाटेच्या बांगी अगोदर सहेरी करणे म्हणजेच थोडे फार खाऊन रोजा मुस्लिम बांधव अल्लाहाच्या नावाने धरतात. सायंकाळी मगरीब नमाजच्या बांगी बरोबर सोडला जातो त्यास इफ्तारी असे म्हणतात.

रोजे करण्याबरोबरच नमाज, कुराण पठण करणे, तराविहची नमाज व दान धर्मावर मुस्लिम बांधवांचा जास्त भर असतो. या महिन्यात मुस्लिम मोहल्ल्यांतून आल्हाददायक असे वातावरण असते. महिन्या भराचे रोजे होऊन चंद्र दर्शन झाल्यावर रमजान ईद साजरी केली जाते.

# नेरळ येथे साहित्य गौरव ग्रंथाचे प्रकाशन

**नेरळ : प्रतिनिधी**

ज्येष्ठ कवी नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या जीवनकार्यावर आधारित 'कवी नारायण सुर्वे साहित्य गौरव ग्रंथ' याचे प्रकाशन जेष्ठ नागरिक सभागृह, नेरळ येथे उत्साहात झाले. यावेळी ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, अनुभवाच्या मुशीतून तावून सुलाखून निघालेली नारायण सुर्वे यांची कविता माणसातील माणूस जिवंत करणारी आहे. त्यांच्या कवितेतून प्रखर संवेदना पाझरत राहते.



समाजातील वंचित, कष्टकरी आणि उपेक्षितांच्या भावविश्वाला त्यांनी समर्थ शब्द दिले. ग्रंथाचे संपादन लेखक-साहित्यिक गिरीश कंटे यांनी केले असून, जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात आलेल्या या ग्रंथामध्ये विविध लेखक व साहित्यिकांनी लेखन केले आहे. प्रकाशन सोहळ्यात ग्रंथामध्ये लेखन करणाऱ्या सर्व लेखक-साहित्यिकांचा सन्मान करण्यात आला.

या वेळी लेखक-साहित्यिक प्रसाद हनुमंते यांचाही सन्मान ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमास रानकवी तुकाराम धांडे, प्रा. सुधीर घागस, पीपल्स पब्लिकेशनचे प्रकाशक प्रा. हरेंद्र सोस्टे, स्वातंत्र्य सैनिक गोमाजी रामा पाटील प्रतिष्ठानच्या संस्थापिका अनुसयाबाई जामघरे, नेरळचे माजी सरपंच सावळाराम जाधव तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण साहित्यप्रेमींच्या उपस्थितीने भारावून गेले होते. नारायण सुर्वे यांच्या साहित्य वारशाचे जतन व संवर्धन करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## निवडक



### ओवळे येथे शिवजयंती साजरी

**पनवेल :** ओवळे येथील दुर्गा भ्रमंती ग्रुप व ग्रामस्थ मंडळ ओवले यांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भव्य मिरवणूक ढोल ताशाच्या गजरात लेझीम खेळण्यात आले तसेच विद्यार्थ्यांनी पोवाडा गायन करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जुन्या आठवणीला उजाळा देत शिवजयंती साजरा केली तसेच राष्ट्रवीर संघ यांच्याकडून मर्दानी लाठी काठी खेळ साकारण्यात आले.

### कामोठे येथे रक्तदान शिबिर



**पनवेल :** कामोठे वसाहतीमधील श्री युवा मित्र मंडळ कामोठेचा विघ्नहर्ता उत्सव समिती आयोजित छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवजन्मोत्सवानिमित्त भव्य रक्तदान शिबिर व आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. यावेळी मंडळातील प्रत्येक सदस्याने रक्तदान करून कर्तव्य बजावले व परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

### नाईक महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन

**नवी मुंबई :** कोपरखैरणे येथील श्रमिक शिक्षण मंडळाचे एफ.जी. नाईक महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागांतर्गत



वार्षिक स्नेहसंमेलन 'आरंभ' २०२६ – द बिगिनिंग या कार्यक्रमाचे आयोजन विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी येथे करण्यात आले होते. यावेळी माजी नगरसेवक केशव म्हात्रे, ज्येष्ठ समाजसेवक, सदानंद म्हात्रे, नगरसेविका वैष्णवी नाईक, अॅड. भारती पाटील, अॅड. सायली शिंदे, मीनाक्षी पाटील, नगरसेवक रॉबिन मढवी, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी नरेंद्र म्हात्रे, रा.फ.नाईक विद्यालय मुख्याध्यापक रवींद्र पाटील, मुख्याध्यापिका राजश्री यादव, एफ.जी. नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक आदी उपस्थित होते.

# नवी मुंबईत रस्ते सुरक्षा जनजागृती

## 'सुरक्षित प्रवास, हीच काळाची गरज'चा दिला संदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शहरात रस्ते सुरक्षा आणि वाहतूक नियमांबद्दल जनजागृती करण्यासाठी नवी मुंबई वाहतूक पोलीस आणि भावना ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने १७ फेब्रुवारी रोजी एका दिमाखदार कार आणि बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. 'सुरक्षित प्रवास, हीच काळाची गरज' हा संदेश देत या रॅलीने संपूर्ण नवी मुंबईचे लक्ष वेधून घेतले.

ही रॅली नवी मुंबई वाहतूक पोलीस विभागाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहिनी लोखंडे यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली पार पडली. तसेच भावना ग्रुपचे सर्वेसर्वा राजेश शहा, अपर्णा राजेश शहा, हर्षित शहा आणि अंकिता शहा यांची या सोहळ्याला विशेष उपस्थिती होती. या रॅलीमध्ये सहभागी झालेले सर्व




बाईकस्वार हेल्मेट परिधान करून आणि वाहतूक नियमांचे पालन करून शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी झाले होते. वाहनांवर वाहतूक सुरक्षा आणि नियमांची जाणीव करून देणारे विविध माहितीपर बॅनर लावण्यात आले होते.

भावना ग्रुपच्या वतीने महिंद्रा, किया, होंडा रेडविंग आणि बिगविंग यांसारख्या नामांकित ब्रँड्सच्या कार, बाईक्स या रॅलीत सहभागी झाल्या होत्या. मोहिनी लोखंडे यांच्यासह अनेक पोलीस अधिकारी, कर्मचारी या रॅलीत सहभागी होऊन नागरिकांना सुरक्षिततेचा संदेश दिला. सर्वसामान्यांमध्ये रस्ते सुरक्षेबाबत पुन्हा एकदा जाणीव निर्माण करणे आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी नियमांचे पालन करण्याचे आवाहन करणे, हा या भव्य रॅलीचा मुख्य उद्देश होता.

भावना ग्रुपचे कर्मचारी आणि वाहनधारकांनी अतिशय उत्साहात या सोहळ्यात सहभाग नोंदवला. वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे हे केवळ कायदेशीर बंधन नसून, ते आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक आहे.

## नवी मुंबई मनपा स्थायी समितीवर सदस्यांची निवड

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या अत्यंत महत्त्वाच्या स्थायी समितीवर सदस्यांची निवड २० फेब्रुवारी रोजी पालिकेच्या सर्वसाधरण सभागृहात करण्यात आली आहे. महापालिकेच्या आर्थिक अंदाजपत्रकासह विकासकामे, धोरणात्मक निर्णय व प्रशासकीय बाबींमध्ये स्थायी समितीची भूमिका निर्णायक असते.

या निवडीत भारतीय जनता पक्षाकडून सुधाकर सोनवणे, अशोक पाटील, प्रदीप गवस, सागर नाईक, अंजली वाळुंज, जयवंत सुतार, शशिकांत भोईर, स्वाती गुरखे, संदीप म्हात्रे आणि सुरेश शेट्टी यांची स्थायी समिती सदस्य म्हणून निवड झाली आहे.

शिवसेनेकडून आकाश मढवी, शिवराम पाटील, मंदाकिनी म्हात्रे, दीपाली सकपाळ, सरोज पाटील आणि सुरेश कुलकर्णी यांची स्थायी समितीवर नियुक्ती करण्यात आली आहे. या १६ सदस्या मधून एक सभापतीची निवड होणार आहे.

या स्थायी समिती सभापती च्या होणाऱ्या निवडणुकीत भाजपचे माजी महापौर सुधाकर सोनवणे, जयवंत सुतार व अशोक पाटील यांचे नाव चर्चेत राहणार आहे. स्थायी समितीवर निवड झालेल्या सदस्यांकडून नवी मुंबईच्या विकासकामांना गती देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## गरजूंना चादरीचे वाटप

### शिवजयंतीनिमित्त स्तुत्य उपक्रम

**उरण : बातमीदार**

श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांचे कार्य व विचारांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे शिवजयंतीचे औचित्य साधून उरण तालुक्यातील करळ फाटा येथील झोपडपट्टीतील गोरगरीब गरजूंना, नागरिकांना चादरीचे (ब्लँकेटचे) वाटप करण्यात आले.

या वेळी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे सुदेश पाटील, विठ्ठल ममताबादे, कुमार ठाकूर, प्रेम म्हात्रे, माधव म्हात्रे, अन्वी पाटील, हेमंत ठाकूर, कृष्णा कोळी, सादिक शेख, साहिल म्हात्रे, परशुराम म्हात्रे, घनश्याम पाटील, सचिन म्हात्रे, अभय पाटील, प्रकाश म्हात्रे, नारायण कोळी आदी पदाधिकारी सदस्य, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

उपक्रमासाठी राजेंद्र भगत यांचे विशेष सहकार्य लाभल्याने त्यांचेही या वेळी आभार मानण्यात आले.



## मोफत महिला आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद




**उरण : बातमीदार, वार्ताहर**

महिलांच्या आरोग्य प्रति जागरूकता निर्माण करण्यासाठी श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण आणि आई माऊली महिला ग्राम संघ यांच्या संयुक्त विद्यमाने १८ फेब्रुवारी २०२६ रोजी करंजा येथे मोफत मेमोग्राफी आणि पेप्समेयर तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

करंजा ग्रुप ग्रामपंचायत चांणजे येथील द्रोणागिरी देवीच्या मैदानात सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत शिबिर पार पडले. या शिबिरासाठी एमओसी कॅन्सर केअर सेंटर पनवेल यांचे तांत्रिक सहकार्य लाभले. सेंटरचे नितीन पटेल, विजय औटी, सतीश पारेकर, ऋतुषा बामणे, शगुप्ता खान यांनी उपस्थित महिलांचे आरोग्य तपासणी करून त्यांना मार्गदर्शन केले. कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे या उद्देशाने मेमोग्राफी आणि महत्त्वाच्या चाचण्या या वेळी विनामूल्य करण्यात आल्या. त्याचप्रमाणे उरणमधीलप्रसिद्ध डॉ अजय कोळी आणि डॉ. विकास मोरे यांचेही महत्त्वाचे योगदान लाभले. या सामाजिक उपक्रमासाठी श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्थेच्या अध्यक्षा संगीता ढेरे, कविता म्हात्रे आणि अभया म्हात्रे यांनी विशेष मेहनत घेतली.

आई माऊली ग्राम संघाच्या अध्यक्षा अनु पाटील, नैना पाटील, उज्वला म्हात्रे, तृप्ती घरत आणि निशा म्हात्रे यांचे शिबिराच्या नियोजनात मोठे योगदान लाभले.

## उरण महाविद्यालयात शिवजयंती

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील इतिहास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे आयोजन केले गेले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमात उपस्थित सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने छत्रपती शिवाजी राजांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करण्यात आले. इतिहास विभाग प्रमुख डॉ. एम.जी. लोणे यांनी यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकताना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण करून रयतेला सुखी करण्याचे कार्य केले असे प्रतिपादन केले.

अध्यक्षीय समारोपात प्रा. व्हि. एस. इंदुलकर यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांनी छत्रपती शिवाजी राजांची समाधी शोधून काढली व शिवजयंतीची सुरवात केल्याचा उल्लेख केला. त्याचबरोबर शिवाजी राजांचा शेतकऱ्यांबद्दलच्या दृष्टिकोन, स्त्री विषयक दृष्टिकोन, पर्यावरण दृष्टिकोन इत्यादी विषयावर प्रकाश टाकला.

सूत्रसंचालन व प्रस्ताविक प्रा.डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एच.के. जगताप यांनी व्यक्त केले कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



## प्रथमेश म्हात्रेची युवा महोत्सवात उल्लेखनीय कामगिरी



**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरण तालुक्यातील फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रथमेश सदानंद म्हात्रे याने जसं जेएसएस अकादमीऑफ हायर एज्यूकेशनअँड रिषर्च, म्हैसूर विद्यापीठ येथे आयोजित एआययू आयोजित ३९व्या आंतरविद्यापीठ साउथ वेस्ट झोन युवा महोत्सव-२०२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करीत महाविद्यालयाचे नाव देशपातळीवर झळकवले आहे.

या महोत्सवात प्रथमेशने मातीकाम स्पर्धेत तृतीय क्रमांक (कांस्य पदक) पटकावला, तर पोस्टर मेकिंग स्पर्धेत चतुर्थ स्थान मिळवले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुंबई विद्यापीठाने या महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपद (ओव्हरऑल चॅम्पियनशिप) मिळवले. ज्यात प्रथमेशचे योगदान मोलाचे ठरले.

या अभूतपूर्व यशाबद्दल 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कॉलेज विकास समितीचे सदस्य सुधीर घरत, प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, डॉ. सुजाता आदींनी प्रथमेशचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

## जेएनपीटी टाऊनशिपमध्ये शिवरायांच्या नावाचा जयघोष

**उरण : बातमीदार**

आर. के. एफ. जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालय, शेवा येथे गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ रोजी 'शिवजयंती उत्सव' अत्यंत जल्लोषात आणि पारंपारिक उत्साहात झाला. या दिमाखदार सोहळ्याने संपूर्ण जेएनपीटी टाऊनशिप परिसर भगवामय झाला असून शिवरायांच्या जयघोषाने भारावून गेला होता.



कार्यक्रमाच्या उद्‌घाटनावेळी पालक-शिक्षक संघाचे प्राथमिक मराठी माध्यम विभागाच्या उपाध्यक्षा अश्विनी पाटील, प्राथमिक इंग्रजी माध्यमाचे उपाध्यक्ष अॅड. केवल गावंड, माध्यमिक इंग्रजी माध्यमाचे उपाध्यक्ष अविनाश म्हात्रे, तसेच विश्वास पाटील, पालक संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष योगेश तांडेल, उपाध्यक्ष रमाकांत म्हात्रे, आणि जासईचे गुरुनाथ म्हात्रे आदी उपस्थित होते. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे माध्यमिक विभागाच्या विद्यार्थिनींचे लेझीम पथक होते. क्रीडा शिक्षक मनोहर टेमकर यांच्या मार्गदर्शनाखाली पारंपारिक मराठमोळ्या वेशभूषेत या मुलींनी लेझीमचा ताल धरला.

सूत्रसंचालन किशोर म्हात्रे आणि मिलिंद ठाकूर यांनी संयुक्तपणे केले. कार्यक्रमासाठी शाळेच्या तिन्ही विभागांच्या मुख्याध्यापकांचे म्हणजे रमाकांत गावंड (प्राथमिक), गिरीश पाटील (माध्यमिक), अंकुश जोगळे, भूषण जाधव, आणि मुख्याध्यापिका वैशाली बोरचटे (बालोद्यान) यांचे नियोजन कौतुकास्पद ठरले. तसेच ज्येष्ठ शिक्षक जगदीश मढवी आणि सुपरवायझर चंदा टेमकर यांचेही सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी मेहनत घेणाऱ्या सर्वांचे आभार मुख्याध्यापक रमाकांत गावंड यांनी मानले.

## युईएस स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

युईएस स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ऑण्ड कॉमर्स ऑण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ऑण्ड टेक्नॉलॉजीमध्ये शिवजयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.



या निमित्ताने विमला तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याजवळ विदयार्थी पारंपारिक वेषभूषेत जमले होते. युईएस संस्थेच्या ट्रस्टी मेंबर्सनी शिवरायांच्या मूर्तीस पुष्पहार घातले, त्यानंतर पालखीतील शिवरायांच्या मूर्तीसही पुष्पहार घालून अभिवादन केले व आठवीच्या विद्यार्थ्यांनी शिवगर्जना दिली. त्यांच्यासोबत सिनियर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, समन्वयक, पीटीए सदस्य, पालकगण, शिक्षकगण व स्कूल, ज्युनिअर व सिनियर कॉलेजचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

यानंतर ढोलताशे व लेझिमच्या लयबद्ध वाद्यवृंदासह महाराजांच्या पालखीची मिरवणूक युईएस स्कूल ऑण्ड कॉलेजच्या दिशेने निघाली.

शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी महाराजांच्या जीवनावर नृत्य सादर केले तर सिनिअर कॉलेजच्या विद्यार्थीनींनी पोवाडा सादर केला.

## नवीन पनवेल येथील जीसी अस्पिरा सोसायटीत शिवजयंती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार अबालवृद्धांमध्ये रुजले पाहिजेत या उद्देशाने दरवर्षी जीसी अस्पिरा सोसायटीमध्ये शिवजयंती मोठ्या उत्सवात साजरी केली जाते.

कार्यक्रमात सोसायटीतर्फे नवनिर्वाचित नगरसेवक शशिकांत शेळके, मधुकर मधे, दमयंती भोईर, प्रतिभा भोईर, व कविता चौतमोल यांचा सत्कार करण्यात आला. शिवजयंतीनिमित्त सर्व वयोगटासाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे बक्षीस वितरण हे ज्येष्ठ समाजसेवक व लेखक अरविंद मोरे यांनी केले. यावेळी त्यांनी सर्व रहिवाशांना फार मोलाचे मार्गदर्शनही केले. हा कार्यक्रम अध्यक्ष बळीराम साबळे, सचिव विशाल टोपकर यांच्या मार्गदर्शनाखाली व सांस्कृतिक समिती अध्यक्ष अनुष्का शेट्टी व सोसायटीची संचालक समिती आणि सांस्कृतिक समिती सदस्यांच्या प्रयत्नातून साकार झाला.

सत्कारला उत्तर देताना नगरसेवक शशिकांत शेळके यांनी सोसायटीच्या या उपक्रमांना भरपूर दाद दिली व सोसायटीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर असल्याबाबत सोसायटीची विशेष प्रशंसा केली. सर्व उपस्थित नागरिकांना शिवाजी महाराजांचे विचार मांडून मार्गदर्शन केले.

सोसायटीचे अध्यक्ष बळीराम साबळे यांनी सोसायटीतील उपक्रमाबद्दल माहिती दिली व सगळ्यांचे आभार मानले.

## रसायनी पोलीस ठाण्याच्या निरीक्षकपदी अभिजित भुजबळ

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



रसायनी पोलीस ठाण्याचे याअगोदरील निरीक्षक (पीआय) संजय बांगर यांनी दोन वर्ष कार्यभार सांभाळल्याने पुढील सेवेसाठी पिआय संजय बांगर यांची बदली झाली आहे. त्यांच्या जागी पोलीस निरीक्षक अभिजित अरविंद भुजबळ हे बुधवार, दि.१८ पासून सेवेत रुजू झाले आहेत. पीआय भुजबळ गेली १७ वर्ष पोलीस सेवेत कार्यरत आहेत. त्यांनी याअगोदर ठाणे शहर गुन्हे शाखा, गडचिरोली परिक्षेत्र, अलिबाग रायगड दोन वर्ष पोलीस सेवा बजावली आहे.

पीआय अभिजित भुजबळ हे यापूर्वी अलिबाग वाहतूक शाखेत कर्तव्य बजावत होते. त्यांनी राबोडी पोलीस ठाण्यात १५६ चैन स्केचिंग आणि साडेतीन किलो सोने हस्तगत करून चोरट्यांवर मोठी कारवाई केली आहे. भुजबळ यांनी अनेक गुन्ह्यांची शिताफीने उकल केली. गुन्हेगारांचे कर्दनकाळ म्हणून त्यांना ओळखले जाते.

दरम्यान, पीआय भुजबळ यांना शासनाकडून गडचिरोळीत आंतरीक सुरक्षा पदक आणि खडतर सेवा पदक सन्मानाने गौरविण्यात आले आहे. त्यांनी रसायनी पोलीस ठाण्याचा प्रभारी पोलीस निरीक्षकपदाचा पदभार स्वीकारल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# श्रीवर्धनमध्ये महाआरोग्य आणि नेत्र तपासणी शिबिर

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरात समाजहिताचा एक आदर्श उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. शिवसेना शहर संघटना आणि जिजाऊ शिक्षण व सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने उपजिल्हा रुग्णालय येथे मोफत महाआरोग्य व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

या शिबिराचे आयोजन मंत्री भरत गोगावले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना उपनेते निलेश साम्बरे यांच्या सहकार्याने करण्यात आले होते. शिबिरात श्रीवर्धन शहर व तालुक्यातील एकूण २२० रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. विविध आजारांवर तज्ज्ञ सल्ला देण्यात आला तसेच नेत्र तपासणी करून गरजू रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. अनेक ज्येष्ठ नागरिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना





या शिबिरामुळे मोठा दिलासा मिळाला.

या संपूर्ण उपक्रमात उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. कौस्तुभ केळस्कर यांचे योगदान विशेष उल्लेखनीय ठरले. त्यांनी स्वतः उपस्थित राहून रुग्णांची तपासणी, मार्गदर्शन व योग्य उपचाराबाबत सूचना दिल्या. त्यांच्या सहकारी वैद्यकीय कर्मचाऱ्यांनीही परिश्रमपूर्वक काम करत शिबिर सुरळीत पार पाडले.

कार्यक्रमास अविनाश कोळंबेकर, नगराध्यक्ष अतुल चौगुले, देवेंद्र भुसाणे, गणेश मांजरेकर, सावन तवसाळकर, संतोष वेश्वीकर, राजेंद्र चव्हाण, चंद्रकांत भगत, सलोनी मोहित, अजय चव्हाण, पत्रकार आनंद जोशी, सुप्रिया करदेकर, आदित्य भगत, नितीन जोशी आदी उपस्थित होते.

नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने आयोजकांनी समाधान व्यक्त केले.

# खालापूर तालुका शिक्षण मंडळाच्या गैरव्यवहाराबाबत भाजप आक्रमक

## उद्या मोर्चा

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या गैरव्यवहार प्रकरणाबाबत भारतीय जनता पक्ष आक्रमक झाली असून या गैरव्यवहार प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी अशा स्वरूपाची भाजपतर्फे मागणी करण्यात आली आहे.

भाजप शहराध्यक्ष अजय इंगुलकर यांनी याबाबतचे लेखी पत्र संस्थेला पाठवले आहे तसेच भाजप व शिक्षणप्रेमींतर्फे २३ फेब्रुवारी रोजी संस्थेच्या कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

खालापूर तालुक्यातील खेड्यापाड्यातील गरीब शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची खोपोलीत सोय व्हावी यासाठी तालुक्यातील मान्यवर नेत्यांनी; त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी संस्था उभारण्यासाठी निधी गोळा केला व संस्थेची उभारणी केली, पण सध्या या संस्थेत दिवसेंदिवस गैरव्यवहाराबाबत प्रकरणे बाहेर येत असल्याने संस्थेची लक्तरे वेशीवर टांगल्याचे दिसून येत आहे. यामुळे शिक्षणप्रेमी व खोपोलीकरांमध्ये संतापची तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने याचे गांभीर्य लक्षात घेऊन सोमवारी संस्थेच्या कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन केल्याचे शहर अध्यक्ष अजय इंगुलकर व सामाजिक कार्यकर्ते मुकेश रूपवते यांनी सांगितले.

अलीकडेच शिक्षण वेतन प्रकरणात शासनाच्या जुन्या मान्यताचा आधार घेत काही शिक्षकांचे वेतन अनधिकृत्वितिया वाढवून घेण्यात आल्याचा निवेदनात आरोप आहे. या प्रकारामुळे शासन व संस्थेला मोठ्या आर्थिक नुकसानी सामोरे जावे लागत असल्याचे निवेदनात स्पष्ट केले आहे. याबाबत वाशी पोलीस ठाण्यात गुन्हासुद्धा दाखल झाला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल व निःपक्ष चौकशी करण्यात यावी चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधितांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी तसेच शिक्षण वेतन प्रकारातील दोषींकडून नुकसानीची वसुली करावी व संस्थेच्या सर्व आर्थिक व्यवहाराचे विशेष लेखापरीक्षकांकडून ऑडिट करण्यात यावे, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

भाजपच्या नियोजित मोर्चामुळे संस्थेच्या कार्यकारिणीत खळबळ उडाली आहे. संस्थेवर नियमित होणाऱ्या गैरव्यवहाराच्या आरोपाबाबत संस्था कार्यकारिणी बरखास्त करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे. संस्था कार्यकारिणीत अनेक जणांवर विविध प्रकारचे आरोप असल्याचेही सांगण्यात येत आहे. संस्थेने याबाबत गांभीर्याने विचार केला नाही, तर भाजपतर्फे आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे यावेळी इंगुलकर व रूपवते यांनी सांगितले.

भाजपच्या आक्रमक भूमिकेमुळे संस्था काय निर्णय घेणार याकडे खोपोली व खालापूर तालुक्यातील शिक्षणप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# कै. भाई पाशिलकर यांची शोकसभा

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यातील बहुजन समाजाचे नेते स्व. भाई पाशिलकर यांचे १४ फेब्रुवारी रोजी निधन झाले आणि नागरिक शोकाकुल झाले. या नेत्याला शुक्रवारी शोकसभेत आदरांजली वाहण्यात आली.



तत्कालीन यशवंत ग्रामपंचायतीचे सरपंच, पंचायत समितीचे सभापती ते जिल्हा परिषदेचे सभापती, उपाध्यक्ष या कार्यकाळात पाशिलकर यांनी सामान्यजन, शेतकरी, ग्रामीण जनतेची सेवा केली. ज्येष्ठ नागरिक सभागृहात आयोजित शोकसभेत उपस्थितांनी त्यांच्या आठवणी सांगितल्या.

शोकसभेला माजी आमदार अनिकेत तटकरे, रोहा इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष पी.पी. बारदेशकर, ॲड. राजीव साबळे, विजय मोरे, सहकारी मारुती खरीवले, सुरेश मगर, आप्पा देशमुख, ॲड. मनोज शिंदे, उद्देश वाडकर, अशोक धोत्रे, नंदकुमार म्हात्रे, स्नेहा अंबरे, उस्मान रोहेकर, नारायण धनवी, सुरेश महाबळे, अमित उकडे, महेश ठाकूर, राजेंद्र जैन, लिलाधर मोरे, सचिन शेडगे, सूर्यकांत मोरे यांसह राजकीय, सामाजिक, पत्रकारिता क्षेत्रातील प्रतिनिधी अभिवादन करण्यासाठी उपस्थित होते.

या वेळी ॲड. साबळे यांनी घडामोडी घडून गेल्यावर कटुता न ठेवणारे भाई पाशिलकर आम्ही पहिले. माझ्या राजकीय वाटचालीत भाईंचा सिंहाचा वाटा होता, असे नमूद केले.

पी.पी. बारदेशकर यांनी, धाटाव एमआयडीसीला भाई पाशिलकर यांचे कायम पाठबळ मिळाले. आंदोलन काळातही कंपन्या बंद राहता कामा नयेत, कंपन्या वाढल्या पाहिजेत, टिकल्या पाहिजेत, ही भूमिका भाईंची होती, असे त्यांनी सांगितले.

भाई पाशिलकर गुरुतुल्य होते. त्यांची नेहमीच उणीव राहिल, असे मनोजकुमार शिंदे म्हणाले. मारुती खरीवले, सुरेश मगर यांनीही विचार मांडले.

माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी भाई पाशिलकर यांच्या राजकीय मुख्यतः कौटुंबिक नात्यांची घडी अलगद उलघडली. त्यांच्या कार्यातील आठवणींचा समग्र वाङ्मय पुस्तकरूपात यावे, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

# कोंडगाव राजिप शाळेत संगणक कक्षाचे उद्घाटन

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणेजवळील कोंडगाव येथील राजिप शाळेत नव्याने उभारण्यात आलेल्या संगणक कक्षाचे उद्घाटन नवनिर्वाचित जिल्हा परिषदेचे सदस्य सुमित काते यांच्या हस्ते झाले.

विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे व डिजिटल शिक्षणाचा लाभ मिळावा या उद्देशाने हा संगणक कक्ष सुरू करण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला मोठी चालना मिळणार असून डिजिटल साक्षरतेस प्रोत्साहन मिळणार आहे.

उद्घाटन समारंभास कोंडगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच कृष्णा धामणे, शिवसेना नेते विजय धामणे, राजू धामणे, शाखाप्रमुख रामचंद्र धामणे, प्रभाकर धामणे, मंगेश बुरूमकर, नितेश धाडसे, नारायण खोपरे, मुख्याध्यापिका सुषमा भटकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दीपिका बुरमकर, उपाध्यक्ष सुहास मालुसरे, अंगणवाडी शिक्षिका रसिका धामणे, सेविका ममता वाघ तसेच विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित अभ्यास करण्याचे आवाहन केले.



# पेण पालिकेसह विविध सामाजिक संस्थांकडून शिवजयंती साजरी

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती पेण शहरासह तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी बालकांनी शिवकालीन प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमास पेणच्या नगराध्यक्ष प्रितम पाटील, मुख्याधिकारी जीवन पाटील, नगरसेवक, नगरसेविका यांच्यासह शालेय विद्यार्थी, पालिका कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

शहरात सकाळपासूनच शिवजयंतीनिमित्ताने पोवाडे ऐकायला मिळाले. राजांच्या वीरतेची गीते कानावर पडत होती. संपूर्ण पेण महाराजांच्या जयघोषाने निनादून गेले. पालिकेच्या माध्यमातून नगराध्यक्ष प्रीतम पाटील आणि मुख्याधिकारी जीवन पाटील



यांच्यासह नगरसेवक व कर्मचारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात जाऊन महाराजांना पुष्पहार अर्पण केले तसेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाही पुष्पहार अर्पण केले. यावेळी चित्तथरारक शिवकालीन प्रात्यक्षिक विविध बालकांनी सादर केली.

सुबोध विद्यालय, सार्वजनिक विद्यामंदिर आदी शाळांनी शिवजयंतीनिमित्त जयघोष करून रॅली काढली, तर सार्वजनिक विद्यामंदिर येथील निवृत्त प्राचार्य एम.एन. पाटील यांनी महाराजांवरील यशोगाथेचे व्याख्यान सादर केले. पालिका शाळेतील अश्विनी पाटील या विद्यार्थिनीने प्रतापगडाच्या पायथ्याशी महाराजांनी केलेल्या अफजलखानाच्या वधाबाबत पोवाडा गायला, तर भार्गव कुडपाने याने महाराजांची महती सांगून उपस्थितांची मने जिंकली.



**अलिबाग : छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती पिंपळभाट येथे उज्वल भविष्य सामाजिक संस्था आणि माणुसकी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास उज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष उज्वला चंदनशिव यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्याचप्रमाणे माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष व उज्वल भविष्य सामाजिक संस्थेचे सचिव डॉ. राजाराम हुलवान यांच्यासह इतर पदाधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.**

# रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्ताने विविध सामाजिक संस्था, प्रतिनिधी यांचा सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

समाजातील सामाजिक कार्यकर्ते आणि संस्था यांच्या मदतीने अपघातांचे प्रमाण कमी झाले असून असेच सहकार्य राहू द्या, अशी अपेक्षा अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) प्रवीण साळुंखे यांनी व्यक्त केली. ते वाहतूक शाखेच्या नवीन कार्यालयाचे लोकार्पण व अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्या संस्था, कार्यकर्ते यांच्या सन्मान सोहळ्यात बोलत होते.

रस्ता अपघात नियमांविषयी जनजागृती करण्यासाठी दरवर्षी राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा केला जातो.



या उपक्रमाचा मुख्य उद्देश वाहनचालकांना शिस्त लावणे, हेल्मेट-सीटबेल्टचा वापर वाढवणे आणि रस्ता सुरक्षा-जीवन रक्षा हा संदेश घराघरात पोहचवणे हा आहे. या काळात जनजागृती रॅली, हेल्मेट सक्ती तपासणी, ट्रॅफिक नियमांचे शिबिर, चित्रकला व निबंध स्पर्धा आयोजित केल्या जातात. दुचाकीस्वारांनी हेल्मेट घालणे, कारमध्ये सीटबेल्ट वापरणे, वेगमर्यादा पाळणे, मद्यपान करून गाडी न चालवणे आणि मोबाईलचा वापर टाळणे या जागृतीवर भर दिला जातो.

या कार्यक्रमास रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक (वाहतूक) तानाजी चिखले, उपअधीक्षक पुष्पलता दिघे, निरीक्षक भरत शेंडगे, विनोद माळवे, दीपाली जाधव, गुरूनाथ साठेलकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन प्रभारी पोलीस अधिकारी वैभव रोंगे, उपनिरीक्षक देवीदास नाईक, संजय टिळेकर, सर्व अंमलदार यांनी केले होते. यावेळी अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्या संस्था आणि कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला.

# अलिबागेत प्रतापगड पर्वातून शिवचरित्र सादरीकरण

**अलिबाग : प्रतिनिधी**

शिवजयंतीनिमित्त अलिबाग येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात गाज फाउंडेशन आणि मनस्विनी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतापगड पर्व हा विशेष कार्यक्रम रंगला. या कार्यक्रमात शिवरायांच्या जीवनातील निवडक स्फूर्तीदायक प्रसंगांचे नाट्य-संगीताच्या माध्यमातून प्रभावी सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या माध्यमातून शिवरायांचे शौर्य, दूरदृष्टी, लोकाभिमुख राज्यकारभार आणि स्वराज्याची संकल्पना यांचे प्रभावी दर्शन घडविण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक रघुजीराजे आंग्रे (गाज फाउंडेशन) आणि ॲड. मानसी संतोष म्हात्रे (मनस्विनी चॅरिटेबल ट्रस्ट) होते. याशिवाय मावळा प्रतिष्ठानचे आकाश राणे, यतिराज पाटील, सिद्धार्थ नाईक, शुभम नखाते व सहकाऱ्यांनीही सहकार्य केले.

कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य आदिती नाईक दळवी व प्रियदर्शनी पाटील, माजी सभापती चित्रा पाटील, माजी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, माजी सदस्य संजय पाटील, भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, नगराध्यक्ष अक्षया नाईक, चित्रलेखा पाटील, पोलीस निरीक्षक किशोर साळे, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, नगरसेवक ॲड. अंकित बंगेरा, प्रदीप नाईक, संतोष गुरव, समीर ठाकूर, अनिल चोपडा, ॲड. श्वेता पालकर, जमाल सय्यद, विरोधी पक्षनेते संदीप पालकर, सुरेश घरत आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे निवेदन अक्षय चंदेल यांनी केले. संगीत सादरीकरणात श्रेयश साळवी व शुभम गरुड (तबला), अनिरुद्ध सराफ (बासरी), हितेश क्षिरसागर (सिंथेसायझर), श्रवण दौंड (पखवाज), धीरज बडे (ढोलकी), गोविंद चौधरी (तालवाद्य), ऋग्वेद वंगारी (ढोल व डफ) यांचा सहभाग होता. कोरस गटात ओम घेबड, शुभम शिंदे, अभिजीत गुरव आणि प्रणव काकडे यांनी साथ दिली.

नाट्य सादरीकरणात सुरज इंगवले यांनी शिवरायांची भूमिका साकारली, ओमकार पांडव यांनी कवीभूषण, अनिल सावंत यांनी अफजल खान/नेताजी, ऋग्वेद पुंडकर यांनी गोपीनाथ पंत यांची भूमिका साकारली. पडद्यामागील कार्य अभिषेक कोळी यांनी सांभाळले. राजवारसा प्रोडक्शन निर्मित या कार्यक्रमासाठी गीतकार संतोष सातपुते यांचे विशेष योगदान होते. सूत्रसंचलन प्रतिम सुतार यांनी केले.



**चौक : शिवजयंतीनिमित्त खालापूर तालुक्यातील तुपगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन उद्योजक व भाजपचे वडगाव पंचायत समिती विभागीय अध्यक्ष विनोद भोईर यांच्या हस्ते करण्यात आले. शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिषेक करून पूजन करण्यात आले. या वेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयजयकाराने परिसर दुमदुमला होता. तुपगाव आणि परिसरातील जनतेने शिवरायांना मानाचा मुजरा केला.**

# आता लढाई सुपर-८ची! वर्ल्डकपमध्ये टीम इंडियाचा लागणार कस

**मुंबई : प्रतिनिधी**

ट्वेन्टी-२० विश्वचषकाच्या अव्वल आठ (सुपर-८) फेरीचे संघ आता निश्चित झाले असून भारत आणि श्रीलंका या दोन्ही यजमान संघांना यामध्ये स्थान मिळाले आहे. भारतीय संघ या प्रारूपातील गतविजेता असून पुन्हा एकदा जेतेपद मिळविण्यासाठी ते प्रबळ दावेदारांपैकी एक आहेत. वेस्ट इंडिज, दक्षिण आफ्रिका यांच्या बरोबरीने झिम्बाब्वेचा भारताच्या गटात अनपेक्षित समावेश झाल्याने चुरस वाढली आहे.



भारताने आपल्या गटातील सर्व सामने जिंकताना अव्वल आठ फेरीतील आपले स्थान निश्चित केले. यापूर्वी संघाच्या सीडिंग करण्यात आल्यानंतर आठ संघांची चार-चार अशा दोन गटांत विभागणी करण्यात आली. पहिला गट 'एक्स' आणि दुसरा गट 'वाय' असे संघ विभागण्यात आले. त्यामुळे भारतीय संघ 'एक्स' गटात सहभागी झाला. यानंतर झिम्बाब्वे, दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज हे संघ आले. 'वाय' गटात इंग्लंड, न्यूझीलंड, पाकिस्तान व श्रीलंका हे संघ आले. आता भारतीय संघ २२ फेब्रुवारीला दक्षिण आफ्रिका, २६ फेब्रुवारीला झिम्बाब्वे आणि १ मार्चला वेस्ट इंडिजशी सामना करणार आहे.

भारताप्रमाणेच उर्वरित सर्व संघदेखील साखळी फेरीत आपले सर्व सामने जिंकत अग्रस्थानी होते. अव्वल आठ फेरीत भारताला सर्वाधिक आव्हान दक्षिण आफ्रिकेचे असणार आहे. दक्षिण आफ्रिकेचा संघ हा गतउपविजेता आहे. सध्याच्या विश्वचषकातही ते चांगल्या लयीत आहेत. त्यांनी गटातील सर्वच सामन्यांत चमकदार कामगिरी केली. त्यांच्याकडे स्फोटक फलंदाजांसह चांगले अष्टपैलू आणि फिरकीपटूंची फळी आहे. त्यामुळे भारतासाठी ते सर्वाधिक आव्हान उपस्थित करतील. विश्वचषकापूर्वी भारताने त्यांच्याविरुद्ध ट्वेन्टी-२० मालिका जिंकली होती.

सध्याच्या विश्वचषक स्पर्धेत कोणत्या संघाने सर्वाधिक लक्ष वेधले असेल, तर ते झिम्बाब्वेने. त्यांनी अनपेक्षित कामगिरी करताना आपल्या गटात अव्वल स्थान मिळवले. त्यांनी सहयजमान श्रीलंका आणि जागतिक क्रिकेटमधील मजबूत संघ समजल्या जाणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघाला नमविले. आता 'अव्वल आठ' फेरीत देखील ते धक्कादायक निकाल नोंदवितात का याकडेच सर्वांचे लक्ष असेल.

दुसरीकडे वेस्ट इंडिज संघानेही यंदा आपल्या कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधले. आपले सर्व सामने जिंकून ते गटात अव्वल स्थान राहिले. विंडीजचे बरेचशे खेळाडू आयपीएलमध्ये खेळत असल्याने त्यांना भारतातील मैदानांची, परिस्थितीची चांगली माहिती आहे तसेच २०१६मध्ये भारतात झालेला विश्वचषक त्यांनी जिंकला होता.

भारताविरुद्ध विश्वचषक सामना खेळण्यासाठी पाकिस्तानने दिलेल्या नकारानंतर स्पर्धेला वेगळेच वळण निर्माण झाले होते, मात्र आयसीसीच्या मध्यस्थीनंतर पाकिस्तान संघ सामन्यासाठी तयार झाला, पण भारताकडून त्यांना एकतर्फी पराभवाचा सामना करावा लागला. या व्यतिरिक्त पाकिस्तानने उर्वरित सामने जिंकल्याने ते अव्वल आठ फेरीत पोहचले. ते या फेरीसाठी भारतासह एकाच गटात नसले तरीही हे दोन्ही संघ उपांत्य फेरीत एकमेकांविरुद्ध येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# माथेरानमध्ये जय मल्हार चषक क्रिकेट स्पर्धा रंगली

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमधील जय मल्हार संघाने येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रीडा संकुलात प्रथमच टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेत विक्रांत संघाने विजेतेपद, तर मुकद्दर संघाने उपविजेतेपद पटकाविले.

सामने पाहण्यासाठी सलग तीन दिवस येथील क्रीडा संकुलात प्रेक्षकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती तसेच स्पर्धेचे थेट प्रक्षेपण यु ट्युबवर असल्याने अनेकांना ही स्पर्धा घरबसल्यादेखील पाहता आली. दोन आयकॉन खेळाडूंचा समावेश असल्याने स्पर्धेला अधिक रंगत आली.



प्रथम क्रमांकासाठी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्याकडून ६१ हजार रुपये व आकर्षक चषक तसेच उपविजेत्या संघाला नगरसेविका प्रतिभा घावरे यांच्याकडून ३१ हजार रुपये व आकर्षक चषक मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आला. उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, झेल, सामनावीर अशी अनेक पारितोषिक खेळाडूंना प्रदान करण्यात आली. विजेत्या विक्रांत संघाचे धनगर समाज अध्यक्ष राकेश कोकळे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी सर्व संघांना शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेच्या नियोजनासाठी मंगेश गोरे, रामा आखाडे, सुरेश आखाडे, किरण आखाडे, दत्ता, रवी, तुषार, ओंकार, मनोज, रमेश, संजय तसेच जय मल्हार संघाच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. समालोचन मंगेश मोरे, सागर जोशी, मयुरेश कदम, अनिल नाईकडे यांनी केले.

# गाणी शाळेत केंद्रस्तरीय स्पर्धा उत्साहात



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील राजिप शाळा, गाणी येथे वडघर-पांगळोली केंद्रस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचा रंगतदार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अंगी दडलेल्या क्रीडा व कलागुणांना योग्य व्यासपीठ देणारा हा उपक्रम ठरला.

धावणे, लांबउडी, खो-खो, कबड्डी यांसारख्या मैदानी खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत उपस्थितांची मने जिंकली, तर नृत्य, समूहगीत, वेशभूषा स्पर्धा आणि देशभक्तीपर सादरीकरणांनी वातावरण भारावून गेले.

या स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी ज्यांनी आर्थिक व साहित्यिक मदत केली, त्या दानशूर व्यक्ती व संस्थांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

उपक्रमास सरपंच आदित्य कासरुंग, केंद्रप्रमुख महेश दरिपकर, बाल गणेश मित्र मंडळाचे अध्यक्ष विश्वास खांडेकर, ग्रामपंचायत अधिकारी अभिजित माने यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

शाळेचे मुख्याध्यापक योगेश भुसारे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व ग्रामस्थांनी एकजुटीने परिश्रम घेतले.

# एफ.जी. नाईक महाविद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

श्रमिक शिक्षण मंडळाच्या एफ.जी. नाईक महाविद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव अंतर्गत विविध खेळांच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

क्रीडा महोत्सव उद्घाटन समारंभास रा.फ. नाईक विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक रवींद्र पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक, महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. दत्ता घोडके उपस्थित होते.

या क्रीडा महोत्सवात कबड्डी, खो-खो, रिले, बॅडमिंटन, क्रिकेट, कॅरम आणि बुद्धिबळ खेळांचा समावेश होता. क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी क्रीडा समिती प्रमुख शरद जगताप, सदस्य प्रमोद साळुंखे, जान्हवी खारकर यांनी परिश्रम घेतले.

# ऑस्ट्रेलिया आणि अफगाणिस्तानचा विजय

**पल्लेकेले, चेन्नई : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत ऑस्ट्रेलियाला साखळी फेरीतून बाहेर पडावे लागले. जाता जाता ऑस्ट्रेलियाने ओमानवर एकतर्फी विजयाची नोंद केली आहे. या सामन्यातील पहिल्या डावात ओमानचा डाव अवघ्या १०४ धावांवर आटोपला. ऑस्ट्रेलियाने हे माफक लक्ष अवघ्या ९.४ षटकात पूर्ण करून नऊ गडी राखून विजय मिळवला. दुसरीकडे स्पर्धेतून बाहेर पडलेल्या अफगाणिस्ताननेही शेवटच्या सामन्यात कॅनडावर विजय मिळवला.





ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या ओमानचा डाव अवघ्या १६.२ षटकात अवघ्या १०४ धावांवर आटोपला. ओमानकडून फलंदाजी करताना सलामीला आलेला कलीम शून्यावर माघारी परतला. कर्णधार जतिंदर सिंगने १७, हमद मिर्झाने १६, तर वसीम अलीने सर्वाधिक ३२ धावा केल्या. ओमानकडून एकही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. ऑस्ट्रेलियाकडून गोलंदाजी करताना ॲडम झाम्पाने सर्वाधिक चार गडी बाद केले.

ऑस्ट्रेलियाला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या १०५ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या ऑस्ट्रेलियाकडून मिचेल मार्शने ३३ चेंडूत नाबाद ६४ धावा केल्या. यादरम्यान त्याने सात चौकार आणि चार षटकार मारले, तर ट्रॅव्हिस हेडने १९ चेंडूत सहा चौकारांच्या साहाय्याने ३२ धावांची खेळी केली. याशिवाय जोस इंग्लिसने नाबाद १२ धावा केल्या.

दुसऱ्या सामन्यात अफगाणिस्तानने २० षटकांअखेर चार गडी बाद २०० धावांचा डोंगर उभारला होता. अफगाणिस्तानकडून इब्राहिम झादरानने सर्वाधिक ९५ धावांची खेळी केली, तर सेदीकुल्लाह अटलने ४४ धावा केल्या. कॅनडाने आठ गडी गमावून ११८ धावांपर्यंत मजल मारता आली. यासह अफगाणिस्तानने हा सामना ८२ धावांनी आपल्या नावावर केला.

# कोपरखैरण्यात होळी चषक क्रिकेट स्पर्धा; विजेत्या संघांना मिळणार बोकड आणि कोंबड्या बक्षीस

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोपरखैरणे गावात सहयोग मित्र मंडळ, प्रयुक्ता मित्र मंडळ आणि रेडमून एजन्सीच्या वतीने कै. महेंद्र वेटा (कपूरदा) यांच्या स्मरणार्थ श्री कुलदैवत कुटुंबीय क्रिकेट स्पर्धा होळी चषक २०२६ स्पर्धेचे आयोजन करण्याते आले आहे. ही स्पर्धा कोपरखैरण से. २३ येथील भूमिपुत्र मैदानावर २ मार्च रोजी खेळली जाणार आहे.

या स्पर्धेसाठी प्रवेश विनामूल्य असून स्पर्धेत कोपरखैरणे गावातील सर्व कुलदैवत कुटुंबियातील खेळाडू सहभागी होणार आहेत. प्रत्येक संघातील ११ खेळाडूंमध्ये ५० प्लस खेळाडू खेळणार आहेत.

या स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे स्पर्धा संघाला पारितोषिक म्हणून मोठा बोकड (बकरा) व आकर्षक चषक, उपविजेत्या संघाला छोटा बोकड तसेच तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या संघाला सहा कोंबड्या देण्यात येतील.

स्पर्धेत एकूण १२ संघ सहभागी होणार आहेत. प्रत्येक सामना तीन षटकांचा राहणार असून स्पर्धत १४४ खेळाडू आपले नशीब आजमावणार आहेत.

स्पर्धा व्यवस्थित व्हावी यासाठी आयोजक चंद्रकांत पाटील, विनय वेटा, मनोज वेटा, रूपेश पाटील, दिलीप पाटील, योगेश म्हात्रे, राकेश वेटा, श्रीनिवास पाटील, संदीप पाटील, शिवाजी जाधव, संजय पाटील, रवी वेटा, विराज वेटा, सुधीर पाटील, राकेश म्हात्रे, ज्ञानेधर पाटील, राजू म्हात्रे आदी ग्रामस्थ खेळाडू मेहनत घेत असल्याची माहिती अविनाश पाटील यांनी दिली.

# वूमन्स इंडियाने ऑस्ट्रेलियात टी-२० मालिका जिंकली!



**ॲडलेड : वृत्तसंस्था**

स्मृती मानधना आणि जेमिमा रॉड्रिग्ज या जोडगोळीच्या अर्धशतकी खेळींच्या बळावर भारतीय संघाने ऑस्ट्रेलियावर तिसऱ्या टी-२० सामन्यात १७ धावांनी विजय मिळवला. या विजयासह भारतीय संघाने तीन सामन्यांची मालिका २-१ अशी जिंकली आहे. यानंतर तीन सामन्यांची वनडे मालिका आणि नंतर एकमेव टेस्ट होणार आहे.

ॲडलेड ओव्हल येथे झालेल्या लढतीत भारतीय संघाने नाणेफेक जिंकून बॅटिंगचा निर्णय घेतला. शफाली वर्मा सात धावा करून तंबूत परतली. यानंतर स्मृती आणि जेमिमा यांनी दुसऱ्या विकेटसाठी १२१ धावांची भागीदारी रचली. शतकाकडे कूच करणाऱ्या स्मृतीला अनाबेल सदरलँडने बाद केले. स्मृतीने आठ चौकार आणि तीन षटकारांसह ५५ चेंडूत ८२ धावांची खेळी केली. सात चेंडूत दोन चौकार आणि एका षटकारासह १८ धावांची खेळी करत ऋचा घोष तंबूत परतली. अनाबेलनेच जेमिमालाही बाद केले. तिने चार चौकारांसह ४६ चेंडूत ५९ धावांची खेळी केली. भारतीय संघाने १७६ धावांची मजल मारली. ऑस्ट्रेलियातर्फे अनाबेलने दोन, तर किम गॅरथ, सोफी मोलिनक्स यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची उत्तम फॉर्मात असणारी जॉर्जिआ वॉल १० धावांवर बाद झाली. बेथ मूनीला रेणुकाने तंबूत परतावले. फोबी लिचफिल्डने प्रतिकार करत २६ धावांची खेळी केली. अनुभवी एलिसा पेरी फक्त एक धाव करू शकली. जॉर्जिआ वारेहम, अनाबेल सदरलँड याही मोठी खेळी करू शकल्या नाहीत. अष्टपैलू ॲशले गार्डनरने मात्र सहकारी बाद होत असतानाही ४५ चेंडूत पाच चौकार आणि एका षटकारांसह ५७ धावांची खेळी केली. गार्डनरला अरुंधती रेड्डीने बाद केले. गार्डनर बाद होताच ऑस्ट्रेलियाच्या विजयाच्या आशा मावळल्या. भारतातर्फे श्री चरणी आणि श्रेयांका पाटील यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. अरुंधती रेड्डीने दोन विकेट्स घेत या दोघींना चांगली साथ दिली. स्मृतीला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

टी-२० मालिकेपूर्वी क्रिकेट ऑस्ट्रेलियाने महिला संघाचे नेतृत्व सोफी मोलिनक्सकडे सोपवण्याचा निर्णय घेतला. मायदेशात झालेल्या पहिल्याच मालिकेत सोफीच्या नेतृत्वात संघाला पराभवाला सामोरे जावे लागले. २०१७नंतर पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाला मायदेशात अशा स्वरूपाच्या मालिका पराभवाला सामोरे जावे लागले आहे.












**उलवे नोड : दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवस वर्षानिमित्ताने आयोजित प्रौढ महिला आणि पुरुष गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा उलवे नोडमध्ये खेळली जात आहे. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या जिल्हास्तरीय स्पर्धेतील सामन्यांचा थरार सेक्टर १२मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलजवळील रामशेठ ठाकूर मैदानावर सुरू आहे. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सन्मान करण्यात आला. दरम्यान, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर यांनी स्पर्धेदरम्यान खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com